

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर




## ई मासिक विद्यासंवाद

नोव्हेंबर २०२३|आवृत्ती-०५

# ग्राम चलो अभियान







विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करी स्वतंत्र, निर्भय। शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन-जय करावया।।

ई मासिक **विद्यासंवाद**

**शताब्दी महोत्सव विशेषांक**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ १०० शताब्दी वर्ष १९२३ - २०२३

नोव्हेंबर २०२३ | आवृत्ती–०५

मार्गदर्शक
**डॉ. सुभाष चौधरी**
कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**डॉ. संजय दुधे**
प्र–कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

प्रकाशक
**डॉ. राजू हिवसे**
कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

संपादक
**श्री. प्रेमदास वाडकर**
जनसंपर्क अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

मुद्रक
**श्री. प्रवीण गोतमारे**
प्रकाशन अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर



मा. राज्यपाल
**श्री. रमेश बैस**



मा. कुलगुरु
**डॉ. सुभाष चौधरी**



मा. प्र–कुलगुरु
**डॉ. संजय दुधे**



मा. कुलसचिव
**डॉ. राजू हिवसे**

विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करी स्वतंत्र, निर्भय। शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन–जय करावया।।

# विद्यापीठ परिक्षेत्रात पर्यटन वाढीला देणार चालना

## - कुलगुरूंनी केली भंडारा जिल्ह्यातील प्राचीन स्थळांची पाहणी







राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ परिक्षेत्रात पर्यटनात वाढ होत स्थानिकांना रोजगार प्राप्त होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जात आहे. शताब्दी महोत्सवानिमित्त विद्यापीठाकडून राबविल्या जात असलेल्या **'रीचिंग टू अनरीच्ड'** उपक्रम अंतर्गत पर्यटन स्थळांची माहिती गोळा केली जात आहे. या अनुषंगाने माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी भंडारा जिल्ह्यातील विविध प्राचीन व ऐतिहासिक स्थळांची पाहणी मंगळवार, दिनांक ७ नोव्हेंबर २०२३ रोजी केली.

विद्यापीठ शताब्दी महोत्सवाच्या अनुषंगाने ललित कला विभागाच्या वतीने भंडारा जिल्ह्यातील विविध भागात मंडई कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार आहे. मंडई कार्यक्रमांमध्ये परिसरातील महाविद्यालयांचा सहभाग वाढावा म्हणून माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी पवनी येथील श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयात संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांची बैठक घेतली. या बैठकीत भंडारा जिल्ह्यात विविध ठिकाणी नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यात आयोजित मंडई कार्यक्रमांची माहिती देत नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. बैठकीला शताब्दी महोत्सव समिती कक्षाच्या डॉ. कल्पना पांडे, डॉ. अनंत पांडे, डॉ. संतोष कसबेकर, पर्यटन व प्रवास विभागाचे प्रमुख डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे, लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ. जितेंद्र वासनिक, पर्यटन व प्रवास विभागातील शिक्षक डॉ. परिमल सुधाकर, प्रा. शोभना मेश्राम, प्रा. भाग्यश्री हिरादेवे यांच्यासह पवनी परिसरातील विविध महाविद्यालयांचे प्राचार्य उपस्थित होते. प्राचीनस्थळे भेटीदरम्यान विभाग प्रमुख डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे यांनी शिलाप्रकोष्ठ, शिलास्तंभ, गरुड खांब याविषयी उपस्थितांना माहिती दिली.

### विविध प्राचीन स्थळांना भेटी

या बैठकीनंतर माननीय कुलगुरू डॉ. चौधरी यांनी पवनी तालुक्यातील तिलोटा खैरी येथील ३ हजार वर्षांपूर्वीचे असलेल्या शिलाप्रकोष्ठची पाहणी केली. ३ हजार वर्षांपूर्वी बरीयल संस्कृतीमधील लोकांनी या शिलाप्रकोष्ठची निर्मिती केली आहे.

बरियल संस्कृतीतील नागरिकांनीच लोखंडाचा शोध लावल्याची माहिती डॉ. खोब्रागडे यांनी दिली. पारशिवनी नैकुंठ येथील पेंच नदीच्या काठावर याच काळात लोखंडाची भट्टी देखील आढळून आली आहे. शिलाप्रकोष्ठ नंतर विरली खंदार येथील शिलास्तंभ पाहत त्याची माहिती त्यांनी घेतली. पवनी परिसरात अनेक गरुड खांब आहेत. विष्णू मंदिराच्या समोरील भागात अशा प्रकारचे गरुड खांब आढळून येतात. पवनी येथील गरुड खांब ३०० वर्षांपूर्वीचा आहे. तीनशे वर्ष जुन्या अशा गरुड खांबाची निर्मिती भोसले कालीन आहे. यानंतर विरली खंदार येथील स्टोन सर्कल त्याचप्रमाणे पवनी येथील बौद्ध स्तूपाला भेट देत त्याची माहिती घेतली.

### मंडई कार्यक्रमाचे नियोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने भंडारा जिल्ह्यातील विविध ठिकाणी मंडई कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हट्टीडोही पोस्ट महादुरा येथे १० नोव्हेंबर २०२३, कोंढा तालुका पवनी येथे १५ नोव्हेंबर २०२३, करढा जिल्हा भंडारा येथे १७ नोव्हेंबर २०२३, टेकेपार (डोउनझरी) येथे २७ नोव्हेंबर २०२३, मुजबी पोस्ट येथे १२ डिसेंबर २०२३, खोकरला जि. भंडारा येथे १९ डिसेंबर २०२३ व भगतसिंग वार्ड टाकळी येथे २० जानेवारी २०२४ रोजी मंडई कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

## 'सोल्युशन मॅन'ने वाढविली दिवाळी पहाटची रंगत

### विद्यापीठ सोबत असल्याची लोकांमध्ये जाणीव निर्माण करणार - कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी

### ललित कला विभागाची कौशल्य विकासावरील लघु नाटिका




राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील दिवाळी पहाट कार्यक्रमात ललित कला विभागाने सादर केलेल्या कौशल्य विकासावरील 'सोल्यूशन मॅन' या लघू नाटिकेने रंगत आणली. औषधी निर्माणशास्त्र विभागाच्या डॉ. ए. के. डोरले सभागृहात गुरुवार, दिनांक ९ नोव्हेंबर २०२३ रोजी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी तर प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांची उपस्थिती होती. समाधान शोधण्यासाठी विद्यापीठ सोबत असल्याची जाणीव लोकांमध्ये निर्माण व्हावी म्हणून मंडईचे आयोजन केले जाणार असल्याचे कुलगुरू डॉ. चौधरी यांनी मार्गदर्शन करताना सांगितले.

समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचता यावे म्हणून शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने विद्यापीठ 'रिचिंग टू अनरीच्ड' अभियान राबवित आहे. उपलब्ध नैसर्गिक संसाधनांचा वापर करून तेथील नागरिकांना रोजगाराची साधने उपलब्ध करून देण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न असल्याचे कुलगुरू डॉ. चौधरी पुढे बोलताना म्हणाले. विद्यापीठ परिक्षेत्रात पर्यटनाच्या दृष्टीने अनेक प्राचीन स्थळे तसेच वास्तू आहेत.

माञ, पर्यटनाच्या दृष्टीने दुर्लक्षित असून अनेकांना त्याची माहिती नाही. याचा सखोल अभ्यास करून या पर्यटन स्थळांच्या माध्यमातून स्थानिकांना रोजगार कसा उपलब्ध करून देता येईल याबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांच्यासोबत चर्चा झाली आहे. तेथील नागरिकांना उदरनिर्वाहाचे साधन प्राप्त व्हावे, त्यांना स्वावलंबी व सक्षम बनविण्यासाठी कौशल्य विकासाचे शिक्षण देणारे अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहे. दिवाळीनिमित्त गावागावांमध्ये मंडईचे कार्यक्रम आयोजित केले जातात. विद्यापीठाच्या वतीने मंडईच्या कार्यक्रमांमधून कौशल्य विकास तसेच तृणधान्याचे महत्त्व नागरिकांना पटवून देत जनजागृती केली जाणार आहे. उत्पादन कमी असल्याने तृणधान्याचे दर अधिक आहे. पूर्व विदर्भामध्ये औषधी गुणयुक्त तृणधान्याचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होऊ शकते. यातून येथील नागरिकांना मोठा रोजगार मिळू शकतो. या सांस्कृतिक कार्यक्रमांमधून विद्यापीठ गावागावांमध्ये नागरिकांपर्यंत हा संदेश पोहोचविणार असल्याचे कुलगुरू म्हणाले. सोबतच ललित कला विभागाने तयार केलेल्या तृणधान्य महत्त्व व कौशल्य विकास लघु नाटिकेचे त्यांनी कौतुक केले. यावेळी मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे ज्यांनी तृणधान्य हे भारतीय पारंपारिक अन्न असल्याचे सांगितले. तृणधान्य हे औषधीयुक्त अन्न असून यामुळे विविध आजारांपासून बचाव होतो. बाजरी, ज्वारी, कोदो, कुटकी हे आदिवासी धान्य समजले जायचे. माञ, सर्वात जास्त विटामिन्स यामध्ये असल्याचे स संशोधनातून समोर आल्याचे डॉ. दुधे म्हणाले. तृणधान्य व कौशल्य विकासाचे महत्त्व याचा मंडई कार्यक्रमातून नागरिकांना विद्यापीठ संदेश देणार असल्याचे ते म्हणाले. यावेळी कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी सर्व उपस्थितांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन करीत आभार ललित कला विभागाच्या प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात यांनी मानले. कार्यक्रमाला विविध प्राधिकारणी सदस्य, विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ललित कला विभागातील रवींद्र हरडे यांच्यासह औषधी निर्माणशास्त्र विभागातील कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## सोल्युशन मॅनने सोडविली समस्या

उच्च शिक्षण घेऊन देखील रोजगार नसल्याने आत्महत्या करण्याच्या विचारात असलेल्या एका तरुणाला कौशल्य विकासाचे महत्त्व पटवून देणाऱ्या 'सोल्युशन मॅन'ची पटकथा लघु नाटिकेद्वारे सादर करण्यात आली. या लघु नाटिकेतून कौशल्य विकासाचे महत्त्व पटवून देण्यात आले आहे. लघु नाटिकेची संकल्पना ललित कला विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात यांची असून लेखक व दिग्दर्शक हर्षद सालपे हे आहेत. विभागातील डॉ. सदानंद चौधरी, श्री नाना मिसाळ यांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले आहे. लघु नाटिकेत दीक्षा ढोमणे, विवेक मिस्त्री, विजय जथे, पियुष धुमकेकर, वैष्णवी आबळेकर, वैष्णवी मुजुमदार, श्वेता अक्केवार, योगिनी आडे, निहारिका जयदेव, राजश्री उपाध्ये, नासीर शेख, सरला पांडे, राजू वानखेडे, मिलिंद हेमाने यांनी मुख्य भूमिका केली असून नम्रता घाटोळे व नम्रता भारती यांनी सहकार्य केले आहे.





## विद्यापीठ परीक्षेत्रात होणार मंडईचे सांस्कृतिक कार्यक्रम कुलगुरूंच्या उपस्थितीत भंडारा येथे नियोजन बैठक

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या परिक्षेत्रात मंडईचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जाणार आहे. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या उपस्थितीत भंडारा येथील जे. एम. पटेल महाविद्यालयात शनिवार, दिनांक ११ नोव्हेंबर २०२३ रोजी नियोजन बैठक पार पडली. यावेळी आंतरविद्याशाखीय विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. कार्तिक फणीकर उपस्थित होते.

शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने 'रिचिंग टू अनरीच्ड' उपक्रम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ राबवित आहे. शिक्षणासोबतच विद्यापीठ परिक्षेत्रात सामाजिक व आर्थिक परिवर्तन व्हावे म्हणून कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविला जात आहे. भंडारा येथील जे एम पटेल महाविद्यालयात झालेल्या नियोजन बैठकीला परिसरातील २४ सरपंचांची उपस्थिती होती. बैठकीत मंडळी कार्यक्रमाबाबत माहिती देताना कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी या उपक्रमा मागील भूमिका सांगितली.

मंडईच्या माध्यमातून समाजातील सर्व स्तरातील लोक एकत्रित येतात. सामाजिक व आर्थिक परिवर्तनाची भूमिका मंडई कार्यक्रमाच्या माध्यमातून जनमानसात पोहोचवण्यासाठी विद्यापीठ काय करू शकते याबाबत कुलगुरूंनी माहिती दिली. सोबतच गावामध्ये होणाऱ्या प्रत्येक मंडईच्या दोन गटांना पुरस्कार देखील दिले जाणार असल्याचे कुलगुरूंनी सांगितले. प्रथम येणाऱ्या गटाला १० हजार रुपये तर द्वितीय गटाला ५ हजार रुपयांचा पुरस्कार दिला जाणार असल्याचे ते म्हणाले. मंडई कार्यक्रमांमध्ये सरपंच काय भूमिका बजावू शकतात. विद्यापीठाचा हा उपक्रम स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून सरपंचांकडून कुलगुरूंनी माहिती घेतली.

विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाकडून राबविल्या जात असलेल्या विविध कौशल्य अभ्यासक्रमाची माहिती यावेळी सरपंचांना देण्यात आली. या कौशल्य अभ्यासक्रमाच्या माध्यमातून स्वयंरोजगार व रोजगाराची निर्मिती गावांमध्ये कशी केली जाऊ शकते. रोजगार निर्मितीत विद्यापीठ मदत करणार असून लोकांना प्रशिक्षणापासून प्रकल्प अहवाल त्याचप्रमाणे प्रकल्प सुरू होईपर्यंत मदत करण्याची विद्यापीठाची भूमिका असल्याचे कुलगुरूंनी सांगितले. महिला बचत गटांना या उपक्रमात सहभागी करण्याची विनंती बैठकीमध्ये महिला सरपंचांनी केली. सोबतच पर्यटन व्यवसायाला चालना देण्याबाबत सरपंचांनी मत व्यक्त केले. कुलगुरू डॉ. चौधरी यांच्या समवेत झालेल्या बैठकीत विविध गावातील २४ सरपंचांसोबत सकारात्मक चर्चा झाली.





## स्नातक व स्नातकोत्तर नवीन इतिहास विषयावर विद्यापीठात कार्यशाळा

स्नातक व स्नातकोत्तर नवीन इतिहास विषयावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात सोमवार, दिनांक ३० ऑक्टोबर २०२३ रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. औषधी निर्माण शास्त्र विभागाच्या डॉ ए. के. डोरले सभागृहात झालेल्या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे होते. प्रमुख अतिथी म्हणून मानव विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता तथा इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. शामराव कोरेटी, इतिहास अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. नामदेव हटवार, डॉ. प्रियराज महेशकर, डॉ. सूचिस्मिता मिश्रा, डॉ. रवींद्र लोणारे यांची उपस्थिती होती.

इतिहास अभ्यासक्रमात शासनाचा आदेशानुसार नवीन शैक्षणिक धोरणात बदल अपेक्षित होते. त्यानुसार झालेल्या बदलांची माहिती संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापकांना व्हावी या दृष्टीकोनातून सदर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. शामराव कोरेटी यांनी विस्तृत माहिती दिली. त्यांनी नविन शैक्षणिक धोरण, बदललेल्या अभ्यासक्रम बाबत, परीक्षा पद्धत व श्रेयांक पद्धती यावर माहिती दिली. या शिवाय इतिहास अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. नामदेव हटवार यांनी प्राचीन भारताच्या इतिहासशी संबंधित विषयावर झालेल्या बदलावर प्रकाश टाकला. इतिहास अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. प्रियराज महेशकर यांनी वर्कलोड व प्राचीन ज्ञान परंपरेवर आधारित विषयावर झालेल्या बदलावर प्रकाश टाकला. इतिहास अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. सूचिस्मिता मिश्रा यांनी आधुनिक व भारताच्या इतिहासशी संबंधित विषयावर झालेल्या बदलावर प्रकाश टाकला. निमंत्रित सदस्य डॉ. रवींद्र लोणारे यांनी जगाच्या इतिहासशी संबंधित विषयावर झालेल्या बदलावर प्रकाश टाकला. शेवटी सामारोयीय कार्यक्रमात प्र-कुलगुरू डॉ संजय दुधे यांनी उपस्थितांना शासन धोरण व शिक्षकांच्या भूमिकेवर भाष्य केले. काळानुरूप शिक्षकांना अद्यावत व्हावे लागेल व विद्यार्थ्यांना यथोचित कौशल्य व प्रायोजित ज्ञान घ्यावा लागेल, असे विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. राकेश कोरेकर यांनी केले तर आभार डॉ. लक्ष्मण गोरे यांनी मानले. समारोपिय कार्यक्रमातील अथितींचे आभार डॉ. सचिन भोगेकर यांनी मानले.







## विद्यापीठ इतिहास विभागात आंतरराष्ट्रीय परिसंवाद

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर इतिहास विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. औषधी निर्माण शास्त्र विभागाच्या डॉ. ए. के. डोरले सभागृहात हा परिसंवाद सोमवार, दिनांक ३० ऑक्टोबर २०२३ रोजी पार पडला.

परिसंवादाचे उद्‌घाटन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या हस्ते पार पडले. प्रमुख वक्त्या डॉ. श्वेतलाना सिदोरावा (रशिया) होत्या. यावेळी मानव व विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी उपस्थित होते. परिसंवादात 'दि टियर्स ऑफ दि राणीज् ऑफ नागपूर' या विषयावर बोलताना रशियाच्या डॉ. श्वेतलाना सिदोरावा यांनी नागपूरच्या स्थानिक इतिहासावर भाषण केले. भोसले राणीसोबत ब्रिटिश शासनाची भूमिका यावर प्रकाश टाकला. डॉ. श्वेतलाना यांनी पुढे म्हटले की, रघुजी तिसरे यांचा १८५९ मध्ये झालेल्या मृत्यूनंतर वारस घोषित केले नाही. त्यामुळे

ब्रिटीशांनी राज्य खालसा करण्याचे धोरण सुरु केले. याबाबत रघुजीच्या तीन राण्या दुर्गाबाई, आनंदाबाई व कमलजाबाई यांनी आपले अधिकार प्राप्ती साठी; वारस मान्येतेसाठी व खालसा धोरणाचा विरोधात लढा देत ब्रिटीशांचा विरोध केला. त्या महिलांचा प्रयत्नानं यश प्राप्त झाले नसले तरी त्यांचा संघर्ष महत्त्वाचा होता, असे त्या म्हणाल्या. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी आपल्या निवेदनात नागपूरच्या सांस्कृतिक घडामोडीवर प्रकाश टाकला. त्यांनी भोसले वाड्यात दिलेल्या भेटी दरम्यान तेथील परंपरांचा उल्लेख केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी करुन त्यात नागपूरच्या प्राचीन वारसाचा उल्लेख करीत नागपूरचा गोंड कालीन इतिहास व भोसले कालीन इतिहासावर प्रकाश टाकला. संचालन प्रा. स्वप्नील कांबळे यांनी केले व आभार प्रा. स्वप्नील पाटील यांनी मानले.




## धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागरिकांना विविध योजनेच्या माहिती पुस्तिकेचे वितरण

६७ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त शहरात आलेल्या नागरिकांना माहिती व मार्गदर्शन मिळावे म्हणून मंगळवार, दिनांक २४ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता कृषी महाविद्यालय वसतिगृहाजवळ, दीक्षाभूमी, नागपूर येथे माहिती व मार्गदर्शन केंद्र उघडण्यात आले होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व मागासवर्गीय कर्मचारी संघटनेच्या संयुक्त विद्यमाने हे माहिती व मार्गदर्शन केंद्र उघडण्यात आले होते.

माहिती व मार्गदर्शन केंद्राचे उद्‌घाटन अतिरिक्त विभागीय प्रबंधक, दक्षिण पूर्व रेल्वे, नागपूर विभाग श्री. गोरक्ष वि. जगताप (आयआरएस) यांचे शुभहस्ते संपन्न झाले. कार्यक्रमास डिस्ट्रीक्ट बार असोसिएशन, सत्र न्यायालय, नागपूरचे अध्यक्ष ॲड. रोशन बागडे हे प्रमुख अतिथी म्हणून तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी होते. याप्रसंगी विद्यापीठाचे मा. प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे आणि विद्यापीठाचे माजी कुलसचिव व मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे मुख्य सल्लागार डॉ. पुरणचंद्र मेश्राम, उपकुलसचिव श्री मनीष झोडपे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संघटनेचे अध्यक्ष श्री. दिनेश दखणे यांनी केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघटनेचे महासचिव डॉ. चंद्रमणी सहारे यांनी केले तर आभार श्री दर्पण गजभिये यांनी मानले. या कार्यक्रमाकरीता श्री. राजेश नानवटकर, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. मनोज इंगळे , श्री.धम्मा धाबर्डे श्री. विलास बनसोड, शरद बागडे, आकाश भगत, सुरज सुर्यवंशी व श्रीमती रुपाली वाळके, श्रीमती नीलिमा हजारे यांनी प्रयत्न केले

# अभंग देखील कौशल्यच - डॉ. विकास महात्मे

## दहेगाव (रंगारी) येथे राज्यस्तरीय खंजेरी भजन स्पर्धा

## शताब्दी पर्वनिमित्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे आयोजन








अभंग देखील कौशल्यच असल्याचे प्रतिपादन माजी खासदार पद्मश्री डॉ. विकास महात्मे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी पर्व निमित्त भव्य राज्यस्तरीय खंजेरी भजन स्पर्धेचे आयोजन सावनेर तालुक्यातील दहेगाव (रंगारी) येथे शनिवार, दिनांक १८ व रविवार १९ नोव्हेंबर २०२३ रोजी करण्यात आले आहे. विद्यापीठाचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्र व दहेगाव (रंगारी) येथील अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय खंजेरी भजन स्पर्धेचे उद्घाटन करताना डॉ. महात्मे बोलत होते.

खंजेरी भजन स्पर्धेचा उद्घाटन सोहळा शनिवार, दिनांक १८ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी १० वाजता माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. स्पर्धेचे उद्घाटन माजी खासदार पद्मश्री डॉ. विकास महात्मे यांच्या शुभहस्ते झाले. उद्घाटनीय कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज मोझरी येथील सरचिटणीस श्री. जनार्दनपंत बोथे, विद्यापीठ मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, माजी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय वाटमोडे, शताब्दी महोत्सव कक्षाचे समन्वयक डॉ. संतोष कसबेकर, श्री. ज्ञानेश्वरदादा रक्षक, विद्यापीठ रासेयो संचालक डॉ. सोपानदेव पिसे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्र प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे, पुंडलिकराव चौधरी यांची विशेष उपस्थिती होती. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी खंजेरी भजनाच्या माध्यमातून लोकप्रबोधन केले. अभंग हे रंजक शिक्षण आहे. रंजक शिक्षणातून उद्बोधन मनात रुजते. अभंगातून होत असलेले उद्बोधन मनात रुजविण्याचे काम राष्ट्रसंतांनी केले असल्याचे पद्मश्री डॉ. महात्मे यांनी पुढे बोलताना सांगितले. एकदा शिकलेले मनात रुजत नाही. मात्र, वारंवार सराव केल्याने कोणताही विषय आत्मसात होतो. अभंग, भजनाच्या माध्यमातून वारंवार सराव होत असल्याने ते मनात रुजून त्यातून सामाजिक बदल होतो. संतच हे सामाजिक बदल करू शकतात, असे डॉ. महात्मे म्हणाले. स्पर्धेत सहभागी सर्व स्पर्धकांना डॉ. महात्मे शुभेच्छा दिल्या. ग्रामविकासासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ हे ग्रामस्थांसोबत आहे, असे प्रतिपादन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी अध्यक्षीय भाषणातून केले.

विद्यापीठ गावाशी जुळावे म्हणून मंडईच्या माध्यमातून गावागावात पोहोचत आहे. स्थानिक नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर करून गावांमध्ये रोजगार उपलब्ध व्हावे या दृष्टीने विद्यापीठाने कार्य सुरू केले आहे. भंडारा जिल्ह्यात सिल्क क्लस्टर, मधाचे क्लस्टर उभारण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू असल्याचे कुलगुरू म्हणाले. युवकांना रोजगार उभा करण्यास तसेच उत्पादनाच्या विक्रीसाठी देखील विद्यापीठ मदत करणार असल्याचे त्यांनी सांगितले. सोबतच राज्यस्तरीय खंजेरी भजन स्पर्धेत सहभागी स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन केल्याबाबत दहेगाव (रंगारी) येथील अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे कुलगुरूंनी आभार मानले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला गावामधून दिंडी व रामधून फेरी काढण्यात आली. यामध्ये मोठ्या संख्येने ग्रामस्थ सहभागी झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका विषद केली. संचालन विद्यार्थी स्नेहल वाघमारे यांनी केले तर आभार अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांनी मानले.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात अजीम प्रेमजी फाउंडेशनचा प्लेसमेंट ड्राईव्ह

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात अजीम प्रेमजी फाउंडेशनचा प्लेसमेंट ड्राईव्ह रविवार दिनांक १९ नोव्हेंबर २०२३ रोजी पार पडला. विद्यापीठ रोजगार व प्रशिक्षण विभागाच्या वतीने आयोजित प्लेसमेंट ड्राईव्ह मधून रिसोर्स पर्सन या पदावर माजी विद्यार्थ्यांची नियुक्ती केली जाणार आहे.

विद्यापीठ रोजगार व प्रशिक्षण विभागाच्या वतीने अजीम प्रेमजी फाउंडेशनने माजी विद्यार्थ्यांकरीता या ड्राईव्हचे आयोजन केले होते. विज्ञान व तंत्रज्ञान, भाषा तसेच मानव विज्ञान विद्या शाखांमधील पदवी आणि पदव्युत्तर पदवी प्राप्त माजी विद्यार्थ्यांकरीता या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या पदाकरिता पदवीधर माजी विद्यार्थ्यांना शिकविण्याचा ५ वर्ष तर पदव्युत्तर पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना २ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक होते. विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरात हा प्लेसमेंट ड्राइव पार पडला. यावेळी विद्यापीठ रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन, अजीम प्रेमजी फाउंडेशनचे अविनाश झाडे व अभिषेक झा यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. रिसोर्स पर्सन या पदाकरिता एकूण ४४ जणांनी नोंदणी केली तर ८ जण प्रत्यक्ष परीक्षेकरिता उपस्थित होते. यातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना अजीम प्रेमजी फाउंडेशनच्या वतीने मध्य प्रदेश येथे रोजगार प्राप्त होणार आहे.

## वेदनांचा वेद म्हणजे ग्रामगीता - डॉ. शरद निंबाळकर

### राज्यस्तरीय भव्य खंजिरी स्पर्धेचा समारोप - सार्थक गुरुदेव सेवा मंडळाला प्रथम पुरस्कार





वेदनांचा वेद म्हणजे ग्रामगीता असल्याचे प्रतिपादन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दीपर्व निमित्त सावनेर तालुक्यातील दहेगाव (रंगारी) येथे आयोजित वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज भव्य राज्यस्तरीय खंजिरी भजन स्पर्धेचा समारोप रविवार, दिनांक १९ नोव्हेंबर २०२३ रोजी सायंकाळी पार पडला. समारोपीय कार्यक्रमाचे उद्घाटन करताना डॉ. निंबाळकर बोलत होते. यवतमाळ जिल्ह्यातील हस्तापूर येथील सार्थक गुरुदेव सेवा मंडळाने खंजिरी भजन स्पर्धेतील २५ हजार रुपयांचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार पटकावला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन व अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ दहेगाव (रंगारी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय खंजिरी भजन स्पर्धेच्या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी तर उद्घाटक म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोल्याचे माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे आंतर विद्याशाखीय विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, माजी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय वाटमोडे, नागपूर जिल्हा प्रचारक श्री. पुंडलिक चौधरी, श्री. बाबाराव पाटील, श्री. निळकंठ कळंबे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांची उपस्थिती होती. माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर यांनी पुढे बोलताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी भजन, कीर्तन, ग्रामगीता आदी साहित्यातून जनतेचे प्रबोधन केल्याचे सांगितले. राष्ट्रसंतांच्या नावाने असलेल्या विद्यापीठाने गावामध्ये या कार्यक्रमाचे आयोजन केल्याने त्याचे श्रेय त्यांच्या ग्राम विकासाच्या साहित्याला जात असल्याचे ते म्हणाले. देश खऱ्या अर्थाने समृद्ध व्हायचा असेल तर गावाचा विकास होणे आवश्यक आहे असे राष्ट्रसंत म्हणत. ग्राम विकासाची खरी दिशा देणारी ग्रामगीता राष्ट्रसंतांनी ग्रामनाथाला अर्पण केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेच्या रूपाने देशाच्या विकासाचा आराखडा दिला आहे. राष्ट्रसंतांच्या या साहित्यावर चिंतन होण्याची गरज व्यक्त करीत ग्रामगीतेच्या माध्यमातून वेदनेचा हा वेद निर्माण झाल्याचे ते म्हणाले. माणसातला देव ओळखत त्यासाठी योजना राबविणे गरजेचे आहे. शक्ती, संपत्ती नसल्याने गावे आज ओसाड झाली आहेत. गावातील तरुणांनी गावामध्ये रक्षक दल निर्माण करणे गरजेचे आहे. शिक्षण घेतलेल्यांनी गावात येत येथील विकासाकडे लक्ष देण्याचे आवाहन डॉ. निंबाळकर यांनी केले. गावामध्ये निर्माण होणाऱ्या नैसर्गिक संसाधनांवर प्रक्रिया करणारे उद्योग येथेच निर्माण झाल्यास गावाला समृद्धी येईल. राष्ट्रसंतांनी देखील हीच तळमळ ग्रामगीतेतून व्यक्त केली आहे. महाराजांनी सांगितलेले बंधुत्व, दातृत्व व मातृत्व याची शिकवण देणारा मानवता धर्म कळणारे आणि वळणाऱ्या कार्यकर्त्यांची गरज त्यांनी व्यक्त केली.







राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाकडून 'ग्राम चलो अभियान" राबविले जात आहे. या अभियानाच्या माध्यमातून स्थानिक नैसर्गिक संसाधनांचा वापर करून गावांमध्येच रोजगाराची साधने निर्माण व्हावी. कौशल्य विकासाचे मार्गदर्शन मिळत रोजगार-स्वयंरोजगार प्राप्त व्हावा आदी सर्व दृष्टीने विद्यापीठाने कार्य सुरू केले आहे. ग्रामस्थांनी या अभियानाचे घटक व्हावे, असे आवाहन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणातून केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांनी केले. तत्पूर्वी सातत्याने दोन दिवस खंजिरी भजन स्पर्धेचे परीक्षण करणारे परीक्षक हिंगणघाट येथील श्री. श्रीकांत आवारे, श्री. दिलीप झाडे (प्रचारक) व कळमेश्वर येथील श्री. उमेश्वर बारापात्रे यांचा प्रमुख अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. राज्यस्तरीय खंजिरी भजन स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्रातील कर्मचारी त्याचप्रमाणे अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ दहेगाव (रंगारी) येथील कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले.





## विद्यापीठाच्या कलावंतांचे मंडईत सादरीकरण
## विद्यापीठ परीक्षेत्रात मंडईचे सांस्कृतिक कार्यक्रम

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कलावंत मंडई कार्यक्रमाच्या सादरीकरणातून कौशल्य शिक्षण व तृणधान्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करीत आहे. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ परिक्षेत्रात मंडईचे सांस्कृतिक कार्यक्रमांना सुरुवात झाली आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने 'ग्राम चलो अभियान' ('रिचिंग टू अनरीच्ड') उपक्रम राबवित आहे. विद्यापीठ परिक्षेत्रात शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक परिवर्तन व्हावे म्हणून कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविला जात आहे. १३ व १४ नोव्हेंबरला वेला येथे दंडार, २२ नोव्हेंबरला पिंप्री शहापूर, १७ नोव्हेंबरला कारदा, १६ नोव्हेंबरला मुजबी येथे कथासार, गोंधळ, कीर्तन, १५ नोव्हेंबरला कोकड, १३ व १४ नोव्हेंबरला ठाणा जवाहर नगर येथे मंडई, दंडार, कीर्तन, खडा, तमाशा, १९ नोव्हेंबरला बोरगाव (खुर्द), २१ नोव्हेंबर बोरगाव (बु.), २१ नोव्हेंबरला करचखेडा, १५ नोव्हेंबरला मांडवी करडी रोड, २० नोव्हेंबरला सालेबर्डी, १७ व १८ नोव्हेंबरला कडवसी, २३ नोव्हेंबरला जाक, मालेगाव (बाजार), २५ नोव्हेंबरला अजीमाबाद, २६ नोव्हेंबरला बेलगाव, येथे मंडई कार्यक्रम पार पडले.

९ व १० डिसेंबरला शहापूर, ९ डिसेंबरला झबाडा, १९ डिसेंबरला कोकर्ता सोबतच सरपेवाडा, हिंजेवाडा येथे देखील मंडई कार्यक्रम आयोजित केले जाणार आहे. मंडई कार्यक्रमांच्या नियोजनासाठी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या उपस्थितीत भंडारा येथील जे. एम. पटेल महाविद्यालयात नियोजन बैठक काही दिवसांपूर्वीच पार पडली होती. परिसरातील २४ सरपंचांनी त्यांच्या पुढाकारातून मंडई कार्यक्रमाचे आयोजन करणार असल्याचे सांगितले होते. विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाकडून राबविल्या जात असलेल्या विविध कौशल्य अभ्यासक्रमाची त्याचप्रमाणे तृणधान्याच्या औषधी गुणधर्म बाबत जनतेमध्ये जनजागृती केली जात आहे.



# वैश्विक मानवी मूल्यावर विद्यापीठात चर्चासत्र

## - यशस्वी जीवन विद्येचा श्री प्रल्हाद पै यांनी दिला मंत्र



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या औषधी निर्माण शास्त्र विभागात वैश्विक मानवी मूल्यावर चर्चासत्र पार पडले. विभागाच्या डॉ.ए. के. डोरले सभागृहात रविवार, दिनांक २२ ऑक्टोबर २०२३ रोजी पार पडलेल्या चर्चासत्रात जीवनविद्या मिशनचे ट्रस्टी श्री. प्रल्हाद वामनराव पै यांनी यशस्वी जीवनासाठी जीवन विद्येचा मंत्र उपस्थितांना दिला.

चर्चासत्राचे उद्घाटन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ.संजय दुधे यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाला व्याख्याते जीवनविद्या मिशनचे ट्रस्टी श्री. प्रल्हाद वामनराव पै, सीएसआयआर राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थेचे संचालक डॉ. अतुल वैद्य, औषधी निर्माणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रमोद खेडेकर, कार्यक्रमाचे निमंत्रक डॉ.प्रकाश इटनकर यांची उपस्थिती होती. औषधी निर्माण शास्त्र विभागाने जीवनविद्या मिशनचा लाइफ स्किल्स एफ यशस्वी हा २ क्रेडिट कोर्स सुरू केला आहे. जो आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाने मंजूर केला आहे. हा विशेष क्रेडिट कोर्स विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला विशेष परिमाण देतो आणि निसर्गाच्या सार्वभौमिक नियमांवर आधारित आनंदी, उद्देशपूर्ण, समृद्ध आणि सुसंवादी जीवन जगण्यासाठी जीवनातील वैज्ञानिक मूल्ये लागू करतो. व्याख्यानाला उपस्थित असलेले प्रतिनिधी हे आयकर, विक्रीकर, अन्न आणि व प्रशासन, उद्योगपती, उद्योजक, विभाग प्रमुख, प्राचार्य आणि विविध औषधी निर्माण शास्त्र आणि अभियांत्रिकी महाविद्यालयांचे प्राध्यापक यांसारख्या विविध विभागांमध्ये संपूर्ण नागपूरमध्ये कार्यरत असलेल्या अत्यंत प्रभावशाली व्यक्तींच्या विविध गटातील होते. तसेच 'मी टू वी' सारख्या काही स्वयंसेवी संस्था आणि विद्यार्थी यात सहभागी झाल्या. कार्यक्रमाचे संचालन प्रा. रीता वडेटवार, आयुक्त, अन्न व औषध प्रशासन नागपूर डॉ. पुष्पहास बल्लाळ केली. आभार डॉ.प्रकाश इटनकर यांनी मानले.



# भारतभक्ती हीच भारतीयता - अभय बापट

## विद्यापीठ शताब्दी महोत्सव व्याख्यानमाला



भारतीय समाजाच्या अंतिम रांगेतील व्यक्तीचे दुःख आपणास व्याकूळ करीत असेल, तरच आपण स्वतःला भारतभक्त म्हणू शकतो. भारताचे चिंतन करणे, प्रगतीसाठी कार्य करणे, प्रत्येक कार्यात भारताच्या हिताचा विचार करणे ही भारतभक्ती आहे. भारतभक्ती हीच वास्तविकतेत भारतीयता आहे, असे प्रतिपादन स्वामी विवेकानंद केंद्र महाराष्ट्र प्रांत प्रमुख श्री. अभय बापट (मुंबई) यांनी व्यक्त केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात शताब्दी महोत्सव व्याख्यानमाला शुक्रवार, दिनांक ३ नोव्हेंबर २०२३ रोजी पार पडली. 'भारतीयतेची संकल्पना आणि स्वामी विवेकानंद' या विषयावर बापट मार्गदर्शन करीत होते.

व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, मंचावर व्याख्याते म्हणून स्वामी विवेकानंद केंद्र महाराष्ट्र प्रांत प्रमुख श्री. अभय बापट, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, विद्यापीठ हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे, डॉ. संतोष गिऱ्हे उपस्थित होते. निस्वार्थ भावनेने समाजाकरिता कार्य केले तरच समाजाची सेवा होईल, असे सांगत बापट यांनी स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचे मर्म सांगितले. स्वामी विवेकानंद यांनी म्हटले होते की, भारतीय समाज माझा लहानपणाचा पाळणा, तारुण्यातील फुलवारी आणि वृद्धाप काळातील काशी आहे. समाजाप्रती असा उदात्त भाव आपण सर्वांच्या अंतकरणात असला पाहिजे. आपणास यशस्वी नव्हे तर सार्थक जीवन असे त्यांनी सांगितले. बलशाली बना, चारित्र्यसंपन्न बना आणि आपल्या देशावर प्रेम करा, राष्ट्रधर्म हाच भारताचा प्राण आहे, असा स्वामी विवेकानंद यांचा संदेश आहे, असे बापट म्हणाले.

अध्यक्षीय भाषण करताना विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी मनुष्य हा जन्मापासूनच आनंदाचा शोध घेत राहतो, असे म्हणत धर्म हाच आनंदाचा स्त्रोत असल्याचे सांगितले. सहिष्णुता, परोपकार आणि प्रत्येक प्राणीमात्रासोबत सेवाभाव हा भारताचा जगाला जगाला संदेश आहे. प्रास्ताविक करताना हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे यांनी भारतीय जीवनमूल्य ही भारतीयतेचा आधारस्तंभ असल्याचे सांगितले. भारतीय संस्कृती, धर्म, आणि परंपरा समजल्याशिवाय भारतीय मूल्य समजणार नाही, असे त्यांनी सांगितले सोबत व्याख्याते श्री. अभय बापट यांचा परिचय त्यांनी करून दिला. अधिष्ठाता शामराव कोरेटी यांनी आभार व्यक्त करताना भारत ही ज्ञान, विज्ञान आणि अनुसंधान यांची भूमी असल्याचे सांगितले. कार्यक्रमातील संचालन डॉक्टर संतोष गिऱ्हे यांनी केले. कार्यक्रमाला डॉ. संजय पळवेकर, डॉ. जितेंद्र वासनिक , नरेन्द्र परिहार, डॉ. लखेश्वर चन्द्रवंशी, डॉ. सुमित सिंह, डॉ. एकादशी जैतवार, डॉ. कुंजनलाल लिल्हारे, प्रा. जागृती सिंह, प्रा. दामोदर द्विवेदी, प्रा. निशान्त पाटिल, प्रा. रूपाली हिवसे, विवेकानन्द केन्द्रातील डॉ. जगदीश हेडाउ, भरत जोशी, प्रो. विलास देशपांडे, अरुणाताई देशपांडे, विद्यापीठातील




## दक्षता सप्ताह निमित्त विद्यापीठात वादविवाद स्पर्धा

### लोकप्रशासन विभाग व दी ओरिंएटल इंशुरन्स कंपनीचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात दक्षता सप्ताह निमित्त गुरुवार, दिनांक २ नोव्हेंबर २०२३ रोजी वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठ लोकप्रशासन विभाग व दि ओरिंएटल इंशुरन्स कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने ही वादविवाद स्पर्धा घेण्यात आली.

विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेचे उद्घाटन दि ओरिएंटल इंशुरन्स कंपनीचे मुख्य क्षेत्रीय प्रबंधक नरेश कांकरीया, व्यवस्थापक संघपाल साखरे, मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ. जितेंद्र वासनिक यांची प्रमुख उपस्थिती होती. "युवकांनी भ्रष्टाचाराचा सर्वांगीण आढावा घेवून त्याची विवेकनिष्ठ मांडणी करावी" असे मत डॉ. कोरेटी यांनी व्यक्त केले. 'स्पर्धेसाठी भ्रष्टाचाराला जबाबदार कोण? सरकार की नागरिक' असा विषय ठेवण्यात आला होता. यामध्ये विद्यापाठातील विविध विभागातून ३० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. हिंदी विभागातील विशाल खर्चवाल याने प्रथम तर लोकप्रशासन विभागातील अनिरुद्ध तळेगावकर याने द्वितीय पारितोषिक पटकाविले. राज्यशास्त्र विभागातील सिमरन थूल ही तृतीय पुरास्काराची मानकरी ठरली. याशिवाय मिथून मेश्राम आणि अतिशा जैन यांनी प्रोत्साहनपर पारितोषिक प्राप्त केले. राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. विकास जांभूळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. " भ्रष्टाचार ही केवळ देवाण घेवाण पुरती मर्यादीत नसून एक व्यापक संकल्पना आहे. ज्याचे पैलू आपल्याला सामाजिक आणि मानसशास्त्रीय वर्तनात आढळतात" असे मत डॉ. जांभुळकर यांनी व्यक्त केले. डॉ. संतोष गिऱ्हे, डॉ. धर्मेंद्र तूरकर, डॉ. प्रमोद काणेकर यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ. जितेंद्र वासनिक यांनी प्रास्तविक केले. लिंटा टॉमसन यांनी संचालन केले तर डॉ. सुप्रिया डेव्हिड आणि श्रीवर्धन केकतपुरे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रमण शिवणकर, अंकुश मराठे, दक्षता अधिकारी निशांत कांबळे आणि सहाय्यक व्यवस्थापक माणिक चव्हाण, यांनी परिश्रम घेतले.



## विद्यापीठाच्या महिला तायक्कांडो संघाची घोषणा

### दक्षिण- पश्चिम विभागीय स्पर्धा

राजस्थान येथील श्री जगदीशप्रसाद झाबरमल तिब्रेवाला विद्यापीठाच्या यजमानपदाखाली होणाऱ्या महिला व पुरुष दक्षिण- पश्चिम विभागीय विद्यापीठ तायक्कांडो स्पर्धेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला संघाची घोषणा क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी केली.

६ ते ११ नोव्हेंबर दरम्यान रंगणाऱ्या या स्पर्धेत विविध वजनगटात नागपूर विद्यापीठाच्या १४ महिला खेळाडू सहभागी होणार आहे. राखीव म्हणून चार महिला खेळाडूंना संघात स्थान देण्यात आले आहे. याशिवाय ५ नोव्हेंबर पर्यंत चालणाऱ्या पुरुष गटातील स्पर्धेत नागपूर विद्यापीठाचा संघ सहभागी झाला आहे.

**विद्यापीठाचा महिला संघ-** स्नेहा मेडपिलवार(४६ किलो प्रेरणा वाणिज्य महाविद्यालय), जान्हवी टिचकुले (४९ किलो- कमन्सि अभियांत्रिकी विद्यालय), कोमल बुरडकर(५३ किलो- भिवापुर महाविद्यालय), मुस्कान राठोर (५७ किलो- वैनगंगा कॉलेज, साकोली), समिक्षा जंजाळे (६२ किलो- डीडी भोयर, मौदा), आकांक्षा किरपान (६७ किलो- शिवाजी सायंस कॉलेज), रेपल रेवतकर(७३ किलो- एनएफएससी नागपूर), क्वाद्रिह अंजूमन (७३ किलो- अंजूमन महाविद्यालय), शिमोन भालधारे (४६ किलो- डीबी सायंस विद्यालय, गोंदिया), सुषमा कावळे(५७ किलो- एस एन मोर कॉलेज तुमसर). यामिनी पुष्पतोडे (वैयक्तिक- कमला नेहरु विद्यालय), स्नेहा मेडपिलवार(वैयक्तिक- प्रेरणा कॉलेज).

**पेअर प्रकारात-** सेजल प्रत्येयी, निहाल राजपुत (आर एस मुंडले कॉलेज). राखीव खेळाडू- माधुरी थेर (४९ किलो- जगत कॉलेज गोरेगाव), टिया आवळे (५३ किलो- प्रियदर्शनी अभियांत्रिकी कॉलेज), सोनाली भोयर(६२ किलो- एसएन मोर कॉलेज), शैली अलहावत(६७ किलो- तिरपुडे महाविद्यालय).

**पुरुष संघ-** यश कांबळे (५४ किलो- रेणुका महाविद्यालय), वंश शर्मा (५८ किलो- नाशिकराव तिरपुडे महाविद्यालय), राकेश सिंग (६३ किलो- शारीरिक शिक्षण महाविद्यालय कोराडी), ओम मोरशेट्टीवार (६८ किलो- प्रियदर्शनी महाविद्यालय), सुनील जांगीड (७४ किलो- नागपूर शारीरिक शिक्षण महाविद्यालय), पृथ्वीराज शेलके (८० किलो- डॉ. आंबेडकर कॉलेज), सुमित कुमार (८७ किलो- वैनगंगा शारी. शिक्षण महाविद्यालय कॉलेज), जगदीश सारंगपुरे (८७ किलोवरील- श्री बिंझाणी कॉलेज), प्रसाद काळे (५८ किलो- सेंटर पाईंट), मृणाल वानखेडे (८७ किलो वरील- प्रियदर्शनी अभियांत्रिकी महाविद्यालय). वैयक्तिक पुरुष- अभिषेक मोहर्ले (भिवापुर महाविद्यालय), प्रतिक बांबोरे (हरीभाउ आदमने कॉलेज). राखीव खेळाडू- बाली तोमर- (५४ किलो- तिरपुडे शारी. शिक्षण महाविद्यालय), पीयूष सातव (६३ किलो- प्रेरणा कॉलेज), आयुष निखारे (६८ किलो- पीडब्ल्यूएस कॉलेज), पंकज चौधरी (७४ किलो- जीएच रायसोनी अभियांत्रिकी कॉलेज), ऋषिकेश पांडे (८० किलो- रामदेवबाबा अभियांत्रिकी कॉलेज).



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरुष कबड्डी संघाची घोषणा

## पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ कबड्डी स्पर्धा

देवी अहिल्या शारीरिक शिक्षण विद्यापीठ, क्रीडा संकुल, खांडवा रोड इंदोर यांच्या अधिपत्याखाली ४ ते ८ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ कबड्डी पुरुष स्पर्धेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संघाची घोषणा विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी केली. विद्यापीठाच्या मैदानावर नुकत्याच पार पडलेल्या आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेच्या आधारे या संघाची घोषणा प्राचार्य डॉ. सचिन चापले, प्राचार्य डॉ समशेर सिंग, डॉ. सविता भोयर आणि डॉ. मनोज आंबटकर यांचा समावेश असणाऱ्या समितीतर्फे करण्यात आली.

**विद्यापीठाचा पुरुष संघ -** गणेश गायधने, चंदू कन्हाळकर (दोन्ही आर्ट्स कॉलेज, सिहोरा), संकेत शेंडे (एसएसएनजे देवळी), रोहित डोनोडे (एलएनपीडब्ल्यू कॉलेज, आंधळगाव), इशक शाह (भिवापूर महाविद्यालय), भूषण वानखेडे (डॉ. हरीभाऊ आदमने कॉलेज, सावनेर), आदित्य पोंगूल (जेसीपीई, नागपूर), अभिषेक निंबाळकर (आरबी तिडके महाविद्यालय, मौदा), हिमांशू केळझरकर (एसबी सिटी कॉलेज, नागपूर), अमित दहिया (पद्मश्री अजित वाडकर कॉलेज, नागपूर), मनोज डोंगरे (प्रियदर्शनी अभियांत्रिकी कॉलेज, नागपूर), ऋषभ सयाम (नारायण काळे कॉलेज, कारंजा).

**राखीव खेळाडू-** सुरज दडमल (आर्ट्स कॉलेज सिहोर), कुणाल चव्हाण (लोक महाविद्यालय, वर्धा), शुभम बावने (एसएसएनजे, देवळी), यश अडगुले (नबीरा महाविद्यालय काटोल), लुकेश सपाटे (आयडीसीपीई नागपूर), हर्षद अगोना (डॉ. हरीभाऊ आदमने कॉलेज, सावनेर), मो. रजा शेख (पीडब्ल्यूएस कॉलेज, नागपूर), महेश ढोले (नारायण काळे कॉलेज, कारंजा).




## नागपूरची रिया दोहतरे पाचव्या स्थानी
## ३७ वे नॅशनल गेम्स ॲथलेटिक्स स्पर्धा

गोवा येथे पार पडलेल्या ३७ व्या नॅशनल गेम्स २०२३ ॲथलेटिक्स स्पर्धेत ३ हजार मीटर स्टीपलचेस प्रकारात महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या नागपूरच्या प्रतिभावंत धावपटू रिया दोहतरेला पाचव्या स्थानावर समाधान मानावे लागले. तर पाच हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत नागपूरच्या शादाब पठाणने स्पर्धा मध्येच सोडली.

बंबोलीम ॲथलेटिक्स स्टेडियम येथे झालेल्या स्पर्धेत ३ हजार स्टीपलचेसमध्ये महाराष्ट्राच्या रिया दोहतरेने १० मि. ४३.२५ सेकंद अशी वेळ नोंदवित पाचवे स्थान प्राप्त केले. प्रथम स्थान हरयाणाच्या प्रिती लांबाने १० मि. १९.७८ अशी वेळ देत मिळविले. तर द्वितीय स्थान महाराष्ट्राच्या कोमल जगदाळेने १० मि. २१.६६ सेकंदासह आणि तिसरे स्थान गुजरातच्या भव्यश्रीने १० मि. ३०.७९ सेकंद वेळेसह प्राप्त केले. रियाने केलेल्या या कामगिरीबद्दल नागपूर जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेचे सचिव डॉ. शरद सुर्यवंशी यांनी समाधान व्यक्त केले. पुरुष गटात पाच हजार मीटर धावण्याच्या शर्यतीत शादाब पठाणने स्पर्धा अर्ध्यावरच सोडत सर्वांना निराश केले. नुकत्याच पार पडलेल्या तिसऱ्या राष्ट्रीय २३ वर्षांखालील ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत शादाबने स्पर्धा विक्रमासह दोन सुवर्णपदक प्राप्त केले होते. तसेच विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन ॲथलेटिक्स स्पर्धेत देखील शादाबने दमदार कामगिरी केली होती. त्यामुळे या राष्ट्रीय स्पर्धेत शादाबकडून पदकाची अपेक्षा सर्वांनाच होती. इतकेच नाही तर तो पदक नक्की जिंकेल असेच महाराष्ट्र संघाला वाटले होते. मात्र शादाबने ऐनवेळी स्पर्धा अर्ध्यातच सोडत सर्वांना निराश केले.

## उच्च विचारातूनच विद्यार्थ्यांचा विकास - डॉ. संजय दुधे
## हर्षा चडार व मुख्तार अहमद यांचा प्रतिभावान विद्यार्थी म्हणून सन्मान

उच्च विचारातूनच विद्यार्थ्यांचा विकास होतो, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा हिन्दी विभाग आणि बँक ऑफ बडोदा यांच्या संयुक्त विद्यमाने गुणवंत विद्यार्थी सत्कार व आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन शनिवार दिनांक ४ नोव्हेंबर २०२३ रोजी करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरु मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय प्र-कुलगुरु डॉ संजय दुधे होते. प्रमुख अतिथी म्हणून बँक ऑफ बडोदाचे मुख्य प्रबंधक श्री. रमेश कुमार, हिन्दी विभाग प्रमुख डॉ मनोज पांडे, बँक ऑफ बडोदाचे वरिष्ठ प्रबंधक क्षेत्रीय कार्यालय नागपूर येथील अभिषेक निर्मल, डॉ. संतोष गिन्हे उपस्थित होते. व्यक्ती शिक्षीत असला तरी समजदार नसेल तर त्याच्या पदवीला काहीच अर्थ नाही. विद्यार्थ्यांमध्ये समज निर्माण व्हावी म्हणून आपण सर्वांना प्रयत्न करावे लागेल, असे डॉ दुधे पुढे बोलताना म्हणाले. नकारात्मक विचार पसरविणारे आणि नकारात्मक वातावरण निर्माण करणार्यांपासून स्वतः:ला दूर ठेवले पाहिजे. सत्कार आपल्या जीवनात प्रोत्साहनाचे काम करते. यापासून विद्यार्थ्यांना जीवनात पुढे जाण्याची प्रेरणा मिळते, असे डॉ. दुधे म्हणाले.




गुणवंत विद्यार्थी सत्कार योजना अंतर्गत यंदा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ हिंदी विभागातील विद्यार्थिनी कु. हर्षा चडार हिला प्रथम पुरस्कार ११०००/- व सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. द्वितीय क्रमांक विभागातील विद्यार्थी मुख्तार अहमद यांचा ७५००/- रुपये आणि सन्मानपत्र देऊन अतिथींच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी बँक ऑफ बडोदाचे मुख्य प्रबंधक श्री. रमेश कुमार यांनी मार्गदर्शन करताना बँकेच्या सामाजिक दायित्वाची माहिती दिली. व्यावसायिक कार्यासह सामाजिक उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी बँक ऑफ बडोदा सदैव तत्पर असल्याचे सांगितले. नागपूर क्षेत्रीय कार्यालयाचे वरिष्ठ प्रबंधक अभिषेक निर्मल यांनी बँकेच्या विविध योजनांची माहिती दिली. हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे यांनी मार्गदर्शन करताना गुणवंत विद्यार्थी सन्मान बँकेची योजना विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणारी असून याला मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे सांगितले.

यावेळी बँक ऑफ बडोदाच्या सौजन्याने आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. 'सोशल मिडिया समाज स्वास्थ्यासाठी हानीकारक आहे' या विषयावर आयोजित वादविवाद स्पर्धेत नागपूर शहरातील विविध महाविद्यालयातील व विद्यापीठाच्या विविध विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. वादविवाद स्पर्धेत प्रथम पुरस्कार आशुतोष तिवारी, द्वितीय पुरस्कार विशाल खर्चवाल, तृतीय पुरस्कार सोनू शर्मा तर अर्श सिद्धिकी व प्रियम कुमारी यांनी प्रोत्साहनपर पुरस्कार पटकावले. स्पर्धेत धरमपेठ विज्ञान महाविद्यालयातील डॉ. राजेश पशीने, केन्द्रीय विद्यालय, वायुसेना नगर, नागपूर येथील वरिष्ठ हिन्दी शिक्षक डॉ. सच्चिदानंद मिश्र तसेच हिन्दी विभागातील डॉ.लखेश्वर चंद्रवंशी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. कार्यक्रमाचे संचालन डॉ. संतोष गिरहे यांनी केले तर डॉ. सुमित सिंह यांनी आभार मानले. यावेळी बँक ऑफ बडोदाच्या राजभाषा अधिकारी प्रतिका साकल्ये व संदीप पोटे उपस्थित होते. कार्यक्रमाला डॉ. धीरज कदम, डॉ. शैलेंद्र कुमार, डॉ. एकादशी जैतवार, डॉ. कुंजनलाल लिल्हारे, प्रा. जागृति सिंह, प्रा. दामोदर द्विवेदी, प्रा. निशान्त पाटिल, प्रा. रूपाली हिवसे यांच्या सह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## साकेत महाविद्यालयाला जेतेपद - आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित पुरुषांच्या आंतर महाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धेत क झोन मध्ये गोंदियाच्या साकेत शारी. शिक्षण महाविद्यालयाने प्रतिस्पर्धीला नमवित जेतेपद प्राप्त केले.

साकोलीतील एमबी पटेल महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात साकेत महाविद्यालयाने एमबी पटेल साकोलीला २-१ ने पराभव करीत झोन विभागात अजिंक्य राहण्याचा मान मिळविला. तत्पूर्वी झालेल्या सामन्यात साकेत महाविद्यालयाने सालेकसाच्या शंकरलाल अग्रवाल कॉलेजचा २-१ ने आणि सालेकसाच्या एमबी पटेलला साकेत कॉलेजने २-१ ने नमवित स्पर्धेत अंतिम फेरी गाठली होती. स्पर्धेच्या

## आंतर महाविद्यालयीन बॅडमिंटन स्पर्धेचे उद्घाटन



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित झोनस्तरीय आंतर महाविद्यालयीन बॅडमिंटन पुरुष व महिला गटाच्या स्पर्धेला काँग्रेस नगरातील धनवटे नॅशनल कॉलेज येथील इनडोअर संकुल आणि रवी नगरातील विद्यापीठाचे सुभेदार संकुल येथे सुरुवात झाली.

डीएनसी येथील बॅडमिंटन कोर्टवर झालेल्या उद्घाटनप्रसंगी डीएनसीचे उपप्राचार्य डॉ. भारती खापेकर, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. देवेंद्र वानखेडे, डॉ. रमेश मंडल, डॉ. सुभाष दाढे, अंश जैन, आदित्य नाहते, अक्षिता देसाई आदी उपस्थित होते. तर सुभेदार सभागृहातील संकुलात झालेल्या महिला गटाच्या स्पर्धेचे उद्घाटन विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ मायक्रो बॉयलॉजी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. अशोक दवंडे, डॉ. आदित्य सोनी, डॉ. अलका पांडे, डॉ. जयंत बुराडे, डॉ. इजाज शेख, डॉ. अश्लेषा इंगोले, डॉ. दीपक बोरकर, महेशसिंग गहेरवाल आदी उपस्थित होते.

पुरुष गटात इन्स्टिट्यूट ऑफ सायंस, अंजूमन महाविद्याल, एजी कॉलेज, सुर्योदय अभियांत्रिकी कॉलेज, वायसीसीई कॉलेज, आयडीसीपीईने प्रतिस्पर्धीला नमवित पुढील फेरीत प्रवेश केला. तर महिलांच्या अ गटात यशोदा गर्ल्स कॉलेज, डॉ. आंबेडकर लॉ कॉले, सिटी प्रिमियर, केडीके, यशवंत महाविद्यालय वर्धा, डॉ. आंबेडकर इन्स्टि. महाविद्यालय, हिस्लॉप कॉलेज तर ब गटात व्हीएमव्ही, शिवाजी सायंस, जीएस, अंजुमन, एलएडी, क गटात एसबी जैन, डॉ. आंबेडकर कॉलेज, रामटेकचे कीट्स, जीएस वाणिज्य, कमिन्स महाविद्यालय आणि ड गटात नॅशनल फायर सव्हिस, शासकीय अभियांत्रिकी, एनआयटी, वायसीसीई, निकालस महिला, एमएम कॉलेज, आरसीओईएम महाविद्यालयाने पुढील फेरीत प्रवेश केला आहे.




## कबड्डीमध्ये एसबी सिटी विजयी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित महिलांच्या आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत क गटातील विभागीय स्पर्धेत दमदार खेळाच्या जोरावर एसबी सिटी महाविद्यालयाने विजय नोंदविला आहे.

रेशीम बाग मैदानावरील सीपी अँड बेरार महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या अंतिम फेरीत एसबी सिटी महाविद्यालयाने सीपी अँड बेरार महाविद्यालयाचा टायब्रेकरमध्ये ६-५ ने पराभव केला. सामन्यात निर्धारीत वेळेपर्यंत दोन्ही संघाने प्रत्येकी २४ गुण नोंदविल्याने सामन्याचा निकाल टायब्रेकरने लावण्यात आला. तत्पूर्वी झालेल्या उपांत्यफेरीच्या सामन्यात एसबी सिटी संघाने प्रेरणा कॉलेजचा ३४-७ ने आणि सीपी अँड बेरार महाविद्यालयाने मोहता विज्ञान महाविद्यालयाचा ३८-७ ने पराभव करीत अंतिम फेरी गाठली होती. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी सीपी अँड बेरार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद बारहाते, डॉ. जे. के. महाजन, उपप्राचार्य डॉ. अरविंद जोशी, डॉ. अरविंद सोवनी, डॉ. निशांत टिपटे आदींनी प्रयत्न केले.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरुष संघाची विजयी हॅट्रीक पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी

दमदार खेळाच्या जोरावर देवी अहिल्या शारीरिक शिक्षण विद्यापीठ, क्रीडा संकुल, खांडवा रोड इंदोर यांच्या अधिपत्याखाली सुरु असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुषांच्या कबड्डी स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संघाने हॅट्रीक विजयाची नोंद केली आहे.

स्पर्धेत पहिल्या लढतीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने एलएलएस विद्यापीठ, उदयपूरला ५५-३३ अशा गुणांनी नमविले. विजयी संघाकडून अभिषेक निंबाळकर, इशक शहाने दमदार खेळ केला. तर दुसऱ्या लढतीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने ओपीजेएस विद्यापीठाला ४७-३१ ने नमविले. या सामन्यात विजयी संघाच्या अभिषेक निंबाळकर, आदित्य पांगुल, इशक शहा, गणेश गायधने यांनी दमदार खेळ करीत महत्वपूर्ण योगदान दिले. तिसऱ्या लढतीत नागपूर विद्यापीठाने गुजरातच्या सरदार पटेल विद्यापीठाला ३९-२५ ने मात दिली. विजयी संघाकडून अभिषेक निंबाळकरने १५ तर गणेश गायधने आणि आदित्य पांगुलने रेड पॉईंटसह सात गुणांचे योगदान दिले. स्पर्धेत नागपूर विद्यापीठाने विजयाची हॅट्रीक नोंदवित जेतेपदाकडे आगेकूच केली आहे. प्रशिक्षक कपिल कुंभलकर आणि व्यवस्थापक विशाल गिरडकर यांच्या मार्गदर्शनात विद्यापीठाच्या खेळाडूंनी हे यश प्राप्त केले. नागपूर संघाने केलेल्या कामगिरीबद्दल राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे व विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी आनंद व्यक्त केला आहे.





## विद्यार्थ्यांनी जाणून घेतली प्राचीन वस्तू जतनाची प्रक्रिया
## भंडारा येथील महर्षी विद्या मंदिरच्या विद्यार्थ्यांची विद्यापीठ पुरातत्व विभागाला भेट

भंडारा येथील महर्षी विद्या मंदिर या शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्राचीन वस्तू जतन करण्याची प्रक्रिया जाणून घेतली. प्राचीन वस्तूंची ओळख करण्यासह विविध प्रश्नांची उत्तरे माहिती करताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरातत्व विभागाला भेट दिल्यानंतर शालेय विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह दिसून आला.

भंडारा अशोक नगर येथील महर्षी विद्या मंदिरातील वर्ग १० तसेच १२ मधील विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या पुरातत्व विभागाला बुधवार, दिनांक १ नोव्हेंबर २०२३ रोजी भेट दिली. या भेटी दरम्यान विद्यार्थ्यांनी विभागातील प्राचीन वस्तू संग्रहालयाची पाहणी केली. संग्रहालयातील प्राचीन वस्तूंचे निरीक्षण करताना विद्यार्थ्यांना विविध प्रश्न पडले. प्राचीन वस्तूंचे संशोधन करताना कोणकोणत्या वस्तू प्राप्त होतात, कोणती चिन्हे मिळतात. प्राचीन वस्तू कशा प्रकारे ओळखायच्या. मातीच्या भांड्यांचा वापर आताही होत आहे. त्यामुळे प्राचीन काळचे असल्याने कसे ओळखावे.

लोखंडी वस्तू कशा वेगळ्या असतात, आधी विविध प्रश्न विद्यार्थ्यांनी यावेळी उपस्थित केले. या प्रश्नांची माहिती विभागातील शिक्षकांनी देत विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. विद्यापीठ पुरातत्व विभाग प्रमुख डॉ. प्रभास साहू यांनी प्राचीन साहित्य म्हणजे काय ?, प्राचीन साहित्य गोडा कसे करतात. शास्त्रीय पद्धतीने त्याचे जतन कसे केले जाते. या सोबतच विभागामध्ये असलेल्या संग्रहालयाबाबत माहिती दिली. विभागाने प्रत्यक्ष संशोधन स्थळी जाऊन विविध प्राचीन वस्तू गोळा केल्या असून त्याचे जतन केल्याची माहिती दिली. विभागातील संग्रहामध्ये असलेल्या बहुतांश वस्तू मध्य युगातील असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पुरातत्व विभागातील डॉ. एकता धारकर, डॉ. मोहन पारधी, के. एस. चंद्रा, नेहा रिछारिया, हिमांशू महाजन यांच्यासह तृतीय व प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी उपस्थिती होती.



## आयआयटी टेकफेस्टमध्ये विद्यापीठाची चमू द्वितीय

## बेंगलुरु येथे पार पडली विभागीय फेरी

आयआयटी बॉम्बेच्या वतीने आयोजित 'टेकफेस्ट' या आशियातील सर्वात मोठ्या विज्ञान व तंत्रज्ञान स्पर्धेतील विभागीय फेरीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे. सोबतच आयआयटी बॉम्बे येथे होणाऱ्या अंतिम फेरीसाठी विद्यापीठाच्या चमूची निवड झाली आहे.

प्रामुख्याने अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचा दबदबा असणाऱ्या आयआयटी बॉम्बेच्या टेकफेस्ट स्पर्धेत ग्लोबल अकॅडमी ऑफ टेक्नॉलॉजी, बंगळुरू येथे २८ ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या विभागीय फेरीत विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी मोठे यश संपादन केले आहे. विभागीय फेरीच्या मेश्मेराइझ इव्हेंटमध्ये विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक मिळवला आहे. आयआयटी बॉम्बेच्या वतीने आयोजित टेकफेस्ट हा आशियातील सर्वात मोठा विज्ञान आणि तंत्रज्ञान महोत्सव आहे. या स्पर्धेकरिता ७५ हजाराहून अधिक नागरिकांची उपस्थिती राहते. त्याचप्रमाणे टेकफेस्ट स्पर्धेत २.८ दशलक्षाहून अधिक नागरिक समाज माध्यमांद्वारे सहभागी होतात. टेकफेस्ट महोत्सवात मेश्मेराइझर, रोबोवार्स, कोझ्मोक्लेंच, प्रश्नमंजुषा व अन्य स्पर्धांचा समावेश आहे.

विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ओ. पी. चिमणकर आणि विद्यार्थ्यांचे समन्वयक डॉ. ए. डी. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली दोन संघांनी टेकफेस्ट २०२३ च्या मेश्मेराइझ स्पर्धेत सक्रिय सहभाग घेतला. काळ्या पृष्ठभागावर दिलेल्या पांढऱ्या रेषेचे अनुसरण करू शकतो असा प्रत्येक संघाने एक स्वदेशी स्वयंचलित रोबोट बनवायचा होता. टॉप ५ मध्ये जाण्यासाठी लाईन फॉलोअर रोबोटला देखील त्याचे कौशल्य वापरून जटिल चक्रव्यूह सोडवावा लागतो. त्याला १२० सेकंदांपेक्षा कमी वेळेत दिलेल्या दोन बिंदूंमधील सर्वात कमी अंतर शोधणे आवश्यक आहे. पहिल्या संघामध्ये संघ प्रमुख सिद्धेश्वर नागपुरे, संस्कारी खोकले व ध्रुव ढोके यांचा समावेश होता. दुसऱ्या संघामध्ये संघ प्रमुख ऋषिकेश पळसोदकर, प्रियांका टोपीवाला यांचा समावेश होता. या संघाने स्पर्धेमध्ये द्वितीय स्थान प्राप्त केले. बेंगलुरु कर्नाटक येथील ग्लोबल अकॅडमी ऑफ टेक्नॉलॉजी येथे २८ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी ८.३० वाजता विभागीय फेरी पार पडली. भोपाल, इंदौर, मुंबई व बेंगलुरु येथे या स्पर्धेतील विभागीय फेरी घेण्यात आली. देशाच्या विविध भागातील शैक्षणिक संस्था तसेच महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला.

### आयआयटी बॉम्बे येथे अंतिम फेरी

आयआयटी बॉम्बे येथे टेकफेस्ट स्पर्धेतील अंतिम फेरी घेतली जाणार आहे. भोपाल, इंदौर, मुंबई व बेंगलुरु येथे झालेल्या विभागीय फेरीमधील विजेत्या ठरलेले ३-३ असे एकूण ६५ संघ आयआयटी बॉम्बे येथील अंतिम फेरीत सहभागी होणार आहे. भौतिकशास्त्र विभागातील या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या इंक्युबेशन केंद्रातील इलेक्टस टेक्नॉलॉजीस स्टार्टअपच्या विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण दिले आहे. या स्पर्धेकरिता विद्यार्थ्यांची तयारी करून घेतल्याने हे यश प्राप्त झाले आहे.



## विभागीय विद्यापीठ तायक्वांदो स्पर्धेत खेळाडूंचे यश
## अखिल भारतीय तायक्वांदो स्पर्धेत होणार सहभागी

दक्षिण- पश्चिम विभागीय विद्यापीठ तायक्वांदो स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या खेळाडूंनी भरघोस यश संपादन केले आहे. राजस्थान येथील श्री जगदीशप्रसाद झाबरमल तिब्रेवाला विद्यापीठाच्या यजमानपदाखाली महिला व पुरुष तायक्वांदो स्पर्धा सुरू आहेत. विद्यापीठातील महिला व पुरुष मिळून एकूण ८ खेळाडूंची अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

राजस्थान येथील श्री जगदीशप्रसाद झाबरमल तिब्रेवाला विद्यापीठाच्या यजमानपदाखाली सुरू असलेल्या तायक्वांदो स्पर्धेत ६८ किलो खालील वजन गटात ओम मोरशेट्टीवार व ८० किलो खालील वजन गटात पृथ्वीराज शेळके यांनी ४ स्थान प्राप्त केले. ५७ खालील वजन गटात मुस्कान राठोडने कांस्यपदक प्राप्त केले. पूनसे प्रकारात वैयक्तिक गटात यामिनी पुष्पतोडे, पूनसे जोडी प्रकारात सेजल परतेकी व निहाल राजपूत यांची निवड करण्यात आली. ४९ किलो खालील वजन गटात जान्हवी टिचकुले तर ६२ किलो खालील वजन गटात समिधा जमजारेची निवड करण्यात आली आहे. विद्यापीठातील वरील सर्व खेळाडूंची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, क्रीडा व शारीरिक विभाग संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी अभिनंदन केले आहे.



## राज्यशास्त्र विभागाच्या वार्षिकांकाचे विमोचन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाच्या वार्षिकांकाचे विमोचन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. विद्यापीठाच्या महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरातील जमनालाल बजाज प्रशासकीय भवन येथील कुलगुरू कार्यालयात हा कार्यक्रम पार पडला. कुलगुरूंनी राज्यशास्त्र विभागाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या 'बझ पॉलिटिका' या वार्षिकांकाचे कौतुक केले. राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर, डॉ. प्रमोद काणेकर, श्री किशोर नैताम, डॉ. भूपेंद्र घरत, श्री. किशोर पाटील, डॉ. अतुल मून, डॉ. दिलीप मेरकप, डॉ. सुशांत चिमणकर, श्री सचिन चापके, डॉ. अभिषेक चिमणकर, डॉ. सुनील अखंडे, श्री. सुशील मंडल, प्राची वासनिक यांची उपस्थिती होती. संपादकीय मंडळात मार्गदर्शक म्हणून विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर, श्री किशोर नैताम, प्राची वासनिक, ईशा अटे, नेहा कापगते, वेणू असाई, मोहित माने, समीर नंदागवळी, इशिका पिंपळकर यांचा समावेश होता.






## जनमाहिती-अपिलीय अधिकाऱ्यांना माहिती अधिकाराचे धडे
## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात माहिती अधिकार अधिनियम कार्यशाळा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात माहिती अधिकार अधिनियम २००५ बाबत कार्यशाळा घेण्यात आली. विद्यापीठाच्या महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरातील जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात गुरुवार, दिनांक ९ नोव्हेंबर २०२३ रोजी दुपारी ३ वाजता झालेल्या कार्यशाळेत जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना माहिती अधिकाराचे धडे देण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. राजू हिवसे तर व्याख्याते म्हणून दादा रामचंद्र बारवरू सिंधू महाविद्यालय नागपूर येथील रजिस्टर श्री. नवीन महेशकुमार अग्रवाल यांची उपस्थिती होती. विद्यापीठातील जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ बाबत व्याख्याते नवीन अग्रवाल यांनी विस्तृत माहिती दिली. माहिती अधिकार कायदा पालन करण्याची जबाबदारी दुहेरी भूमिकेतून पार पाडावी लागते. सरकारी कामात भ्रष्टाचार कमी होऊन पारदर्शकता यावी, त्याचप्रमाणे जबाबदारीची भावना निर्माण व्हावी म्हणून माहिती अधिकार कायदा निर्माण झाल्याचे अग्रवाल यांनी सांगितले. आपल्या देशामध्ये हा कायदा होण्यापूर्वी देखील जगाच्या अन्य देशांमध्ये अशा प्रकारचे कायदे पूर्वीपासूनच अस्तित्वात होते. भारतीय संविधानाने देखील मूलभूत हक्कांमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार नागरिकांना दिला आहे. मात्र, माहिती अधिकार कायद्यामुळे त्याला अधिक बळकटी मिळाली असे ते म्हणाले. माहिती अधिकाराची निर्मिती, त्याचप्रमाणे त्यातील विविध कलम, या कायद्यावरील विविध प्रकरणात उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे निकाल याबाबत विस्तृत माहिती त्यांनी दिली.

माहिती अधिकार अंतर्गत अर्ज आल्यानंतर कोणती माहिती द्यावी, किती दिवसांमध्ये द्यावी, कोणत्या स्वरूपाची माहिती नाकारता येते, माहिती नाकारण्यासाठी उच्च व सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयांचा आधार घेणे. कोणत्या स्वरूपाची वैयक्तिक माहिती न देणे आदी विविध विस्तृत विवेचन त्यांनी त्यांच्या व्याख्यानात केले. यावेळी त्यांनी पावर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे विविध कलमांची विस्तृत माहिती दिली. कार्यशाळेचे संचालन करीत आभार उपकुलसचिव डॉ. रमण मदने यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील सर्व विभागातील जनमाहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.







## वक्तृत्व स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद
## 'छत्रपती शिवाजी महाराज आणि तरुणाई' विषयावर झाली स्पर्धा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसरातील दीक्षांत सभागृहात रविवार दिनांक ५ नोव्हेंबर २०२३ रोजी वक्तृत्व स्पर्धा पार पडली. 'छत्रपती शिवाजी महाराज आणि तरुणाई' या विषयावर घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती व विदर्भ युथ ऑर्गनायझेशन यांच्या संयुक्त विद्यमाने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.




वक्तृत्व स्पर्धेमध्ये ११ पेक्षा अधिक शाळा तसेच ३२ महाविद्यालयातील १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रत्येक स्पर्धकाला बोलण्याकरिता ४ मिनिटांचा कालावधी देण्यात आला. अशा प्रकारे ही स्पर्धा सतत ८ तास सुरू होती. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक स्तरानुसार ३ गटांमध्ये वर्गीकरण करण्यात आले. अ गटात ५ वी ते १२ वी पर्यंतचे व आयटीआय मधील विद्यार्थ्यांचा समावेश होता. ब गटात पदवीधर विद्यार्थी तर क गटात पदव्युत्तर पदवी, पीएचडी आणि सर्व सामान्य नागरिकांचा सहभाग होता. स्वराज्य आणि समकालीन लोकशाही, छत्रपतींचे नेतृत्व, छत्रपतींचे तत्व (गुणवत्ता) आणि छत्रपतींचे शेतकऱ्यांसाठी योगदान असे ४ विषय वक्तृत्व स्पर्धे करिता देण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन सकाळी १०:३० वाजता विद्यापीठाचे आंतर विद्याशाखीय विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, भारतीय सेना मराठा रेजिमेंटचे श्री. देविदास लाखे यांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलित करून व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमाला सई थोटे, अंशुल पटले, श्री. दिनेश धोटे यांची अतिथी म्हणून उपस्थिती होती. श्रीमती लतादेवी लाखे, विद्यापीठ राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर यांनी अ गट, डॉ. दत्ता शेरके आणि डॉ. पुष्पक लोहितकर यांनी ब गट, डॉ. अनिलकुमार मानकर यांनी उर्वरित गटातील स्पर्धकांचे परीक्षण केले. मराठी संस्कृतीला अनुसरून पार्थ मासे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना संमेलनात आमंत्रित करण्यासाठी शिवगर्जना गायली. सृष्टी बोरकर यांनी कार्यक्रमाची रूपरेषा व स्पर्धेची नियमावली उपस्थितांना सांगितली.

श्री देविदास लाखे आणि डॉ. प्रशांत कडू यांच्या भाषणानंतर स्पर्धेची पहिली फेरी सुरू झाली. 11 विविध शाळांमधील 18 विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबत किशोरवयीन मुलांनी भावस्पर्शी मत व्यक्त केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ अंतर्गत ३० विविध महाविद्यालयातील सुमारे ५० स्पर्धकांनी आपले विचार मांडले. त्यानंतर तिसर्या फेरीस सुरुवात झाली. ज्यात विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांनी भाग घेतला. स्पर्धेच्या शेवटी परीक्षकांनी निकाल घोषित केला.

त्यानंतर समारोपीय भागामध्ये सर्व सहभागींना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. विजेत्यांना प्रथम क्रमांकासाठी ३ गटातील ३ स्पर्धकांना प्रत्येकी २ हजार रुपये, त्याचप्रमाणे सर्व द्वितीय क्रमांकासाठी १५०० आणि प्रत्येक उपविजेत्याला १००० असे पुरस्कार देण्यात आले. समारोपीय कार्यक्रमात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, मुख्याध्यापक श्री हेमंत आवारे यांच्या हस्ते स्पर्धेतील विजेत्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. डॉ.संजय दुधे यांच्या भाषणाने कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली. कार्यक्रमाला जल जीवन मिशन इंटर्नशिप आणि G20-C20 समिट नागपूरचे काही विद्यार्थीही उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रुती बोरकर, सई थोटे, अंशुल पटले, निखिल पात्रीकर, हिमांशु महाजन, आर्यन ठाकरे, श्रुती बोधनकर, सोमनाथ लोंडे आणि आयओएसच्या पथकाने सहकार्य केले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटला विजेतेपद - आंतर महाविद्यालयीन बॅडमिंटन स्पर्धा




राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या महिलांच्या आंतर महाविद्यालयीन बॅडमिंटन स्पर्धेत दमदार खेळाच्या जोरावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटने प्रतिस्पर्धीला मात देत दमदार विजयाची नोंद केली.

रवी नगरातील विद्यापीठाच्या सुभेदार इनडोअर संकुलात पार पडलेल्या या अंतिम लढतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संघाने एलएडी महाविद्यालयाचा २-० ने पराभव केला. एकेरीत नेहल गोसावीने देविका कावळेला दोन सेटमध्ये २१-१०, २१-११ ने तर दुहेरीत नेहल- अनन्या दुरुगकर जोडीने देविका- चैताली नायसेचा २१-१३, २१-१५ ने पराभव करीत जेतेपदावर नाव कोरले. परिणामी एलएडी कॉलेजला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या लढतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाने वायसीसीईचा पराभव करीत बाजी मारली. एकेरीत श्रेया नंदनवारने आस्था गणवीरला २१-१७, २१-१७ ने तर दुहेरीत आस्था- शिवाली देशपांडे जोडीने श्रेया- ऋतुजा डाउतपुरेला २१-१६, २१-१२ ने नमवित सामन्यात १-१ अशी बरोबरी साधली. तिसऱ्या निर्णायक लढतीत एकेरीत शिवाली देशपांडेने रुषिका शर्माला २१-३, २१-११ ने नमवित संघाला तिसरे स्थान मिळवून दिले.

तत्पूर्वी स्पर्धेचे उद्‌घाटन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ सुक्ष्मजीव शास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य तसेच पुलगावच्या आर्ट्स अँड सायंस कॉलेजचे डॉ. अशोक दवंडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी, स्पर्धा प्रमुख डॉ. जयंत बुराडे आदी उपस्थित होते. तर स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून आर्ट्स अँड सायंस महाविद्यालय पुलगावचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. हाडगे, तर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे सिनेट सदस्य राहुल हनवंते, उमेश कोलाम, क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी, डॉ. जयंत बुराडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य अजय चौव्हाण यांनी भुषविले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजयी संघाला पुरस्कृत करण्यात आले.





## राष्ट्रीय पर्यावरण युवा संसद विद्यापीठ स्तर फेरी संपन्न
### विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात आयोजन

राष्ट्रीय पर्यावरण युवा संसदेचे आयोजन जानेवारी २०२४ मध्ये करण्यात आले आहे. या राष्ट्रीय पर्यावरण युवा संसदेमध्ये सहभागी होण्यासाठी विद्यापीठ स्तर फेरीत विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात ही विद्यापीठ स्तर फेरी नुकतीच पार पडली. या फेरीतून विभागीय फेरीसाठी १० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

पर्यावरणाविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी म्हणून राष्ट्रीय पर्यावरण युवा संसदेचे आयोजन केले जाते. पर्यावरण रक्षणासाठी काम करणाऱ्या 'स्टुडंट्स फॉर डेव्हलपमेंट' संस्थेकडून राष्ट्रीय पर्यावरण संसद २०२४ चे नियोजन व आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठ स्तरावरील फेरीसाठी प्रमुख अतिथी म्हणून भारताचे प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी नियुक्त केलेले स्वच्छता अँबेसिडर तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे अधिसभा सदस्य श्री. राज मदनकर हे उपस्थित होते. यावेळी परीक्षक म्हणून डॉ. विद्या हरदास, डॉ. प्रतीक लापसे व प्रणिती लवंगे यांनी कार्य सांभाळले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविशंकर मोर यांच्या अध्यक्षतेखाली ही फेरी पार पडली. यावेळी स्टुडंट्स फॉर डेव्हलपमेंटचे राष्ट्रीय सहसमन्वयक श्री. मयूर जव्हेरी, पश्चिम विभागीय समन्वयक श्री. अबुझर हुसेन यांची उपस्थिती होती.

आगामी जानेवारी महिन्यामध्ये आयोजित राष्ट्रीय पर्यावरण युवा संसदेमध्ये १३० विद्यापीठांमधून विद्यार्थी प्रतिनिधी सहभागी होणार आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व स्टुडन्ट फॉर डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात या विद्यापीठ स्तर फेरीचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठ स्तर फेरी व त्यानंतर विभागीय फेरी मधून उत्कृष्ट विद्यार्थ्यांची या राष्ट्रीय पर्यावरण संसदेसाठी निवड करण्यात येते. विद्यापीठ स्तरावरील फेरीमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ परिक्षेत्रातील नागपूर, भंडारा, गोंदिया व वर्धा जिल्ह्यातील ४२ महाविद्यालये सहभागी झाले. विद्यापीठ स्तर फेरीमध्ये आयोजित स्वयंस्फूर्त वक्तृत्व स्पर्धेत एकूण ८४ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यातून विभागीय फेरीसाठी १० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. कार्यक्रमाला उपस्थितांचे आभार प्रा. मृण्मयी कुकडे यांनी मानले.







## समाजातील सर्व घटकांसाठी खेळाचे दालन खुले
## प्र- कुलगुरु डॉ. संजय दुधे यांचे प्रतिपादन ऑरेंज ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धांना सुरुवात

ऑरेंज ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांसाठी खेळाचे दालन खुले केले असल्याचे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी केले. ऑरेंज ऑलिम्पिक टीम आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने ऑरेंज ऑलिम्पिक स्पर्धा- २०२३ चे आयोजन गुरुवार, दिनांक २३ नोव्हेंबर ते मंगळवार, २८ नोव्हेंबर २०२३ दरम्यान विद्यापीठ क्रीडा संकुलात करण्यात आले आहे. स्पर्धेच्या उद्घाटनीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. दुधे मार्गदर्शन करीत होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यंदा आपले शताब्दी महोत्सव साजरे करीत आहे. शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त या उपक्रमाचे आयोजन ऑरेंज ऑलिम्पिक टीमच्या वतीने करण्यात आले आहे. उद्घाटनीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, प्रमुख अतिथी म्हणून व्हीएनआयटीचे संचालक डॉ. प्रमोद पडोळे, आंतरराष्ट्रीय खेळाडू रितिका ठक्कर, विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, नागपूर जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेचे अध्यक्ष श्री गुरुदेव नगराळे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. अध्यक्षीय स्थानावरून पुढे बोलताना डॉ. दुधे यांनी ही स्पर्धा दिव्या चावला यांच्या संकल्पनेतून होत असल्याचे सांगितले. प्रमुख अतिथी व्हीएनआयटीचे संचालक डॉ. प्रमोद पडोळे यांनी ऑरेंज ऑलिंपिक स्पर्धेमुळे खेळाचे वातावरण तयार होती होईल. खेळाडूंना मोठा मंच उपलब्ध करून दिल्याने त्यांनी विद्यापीठाचे धन्यवाद मानले.  आंतरराष्ट्रीय खेळाडू रितिका ठक्कर यांनी मार्गदर्शन करताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ हे प्रत्येक ॲथलेटिक्सला मदत करत असल्याचे सांगितले. प्रास्ताविक करताना स्पर्धेच्या संयोजक दिव्या चावला यांनी स्पर्धेच्या आयोजनामागील भूमिका सांगितली. शुभेच्छा देताना विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी रिचिंग टू अनरीच्ड उपक्रमाची माहिती देत विद्यापीठ समाजातील सर्व घटकांना खेळाच्या सुविधा उपलब्ध करून देणार असल्याचे सांगितले. उद्घाटन या कार्यक्रमाचे संचालन अर्चना कोट्टेवार यांनी केले तर आभार केतन कावरे यांनी मानले. यावेळी डॉ. आदित्य सोनी, डॉ. सोनाली शिरभाते, डॉ. विवेकानंद सिंग यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

## विद्यापीठ ललित कला विभागात फोटोग्राफी कार्यशाळा
## आयक्यूएसी व एमएसएफडीए यांचे संयुक्त आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ललित कला विभागात फोटोग्राफी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाचा आयक्यूएसी विभाग व महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (एमएसएफडीए) यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दिनांक २० नोव्हेंबर ते रविवार, २६ नोव्हेंबर २०२३ दरम्यान ही कार्यशाळा होणार आहे.

ललित कला विभागात आयोजित कार्यशाळेत पद्मश्री सुधारक ओळवे (मुंबई) हे सहभागी प्रतिनिधींना फोटोग्राफीचे प्रशिक्षण देणार आहे. फोटोग्राफी ही एक कला आहे. या फोटोग्राफी कलेचे कौशल्य विद्यार्थी तसेच शिक्षकांना प्राप्त करता यावे म्हणून फोटोग्राफी प्रमोशन ट्रस्ट आणि महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळांचे आयोजन केल्या जात आहे. महाराष्ट्रातील पहिली कार्यशाळा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ललित कला विभागामध्ये शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने घेण्यात आली. या कार्यशाळेचे आयोजन आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य यांनी केले असून समन्वयक म्हणून ललित कला विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात ह्या जबाबदारी सांभाळत आहे. पद्मश्री सुधारक ओळवे यांच्यासह एमएसएफडीएचे व्यवस्थापक श्री. प्रतीक ढमाल, सहाय्यक गौरव पवार यांची देखील या फोटोग्राफी कार्यशाळेला प्रामुख्याने उपस्थिती लाभली आहे. या कार्यशाळेमध्ये विविध विद्या शाखांचे शिक्षक त्याचप्रमाणे विद्यार्थी संपूर्ण महाराष्ट्रातून सहभागी झाले आहेत. या कार्यशाळेमध्ये सहभागी शिक्षक व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून फोटोग्राफीचे कौशल्य शिकता येणार आहे. कार्यशाळेत प्रात्यक्षिकासोबत फोटोग्राफीचे कौशल्य त्याचप्रमाणे चर्चासत्राचे देखील आयोजन केल्या जाणार आहे. कार्यशाळेच्या आयोजनासाठी आयक्यूएससी विभाग तसेच ललित कला विभागातील कर्मचारी प्रयत्नरत आहे.




## प्रयत्नांनी येतो आयुष्यात बदल - डॉ. संजय दुधे
## गोठणगाव येथे कौशल्य विकास प्रशिक्षणास सुरुवात

प्रयत्न केल्याने आयुष्यात बदल होतो, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र-कलगुरु डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी पर्व निमित्ताने 'ग्राम चलो अभियान' राबविले जात आहे. ग्राम चलो अभियान अंतर्गत कुही तालुक्यातील गोसेखुर्द प्रकल्पग्रस्त पूनर्वसित गोठणगाव येथे कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाची गुरुवार, दिनांक २३ नोव्हेंबर २०२३ रोजी सुरुवात करण्यात आली. यावेळी डॉ. दुधे अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करीत होते.

प्रकल्पग्रस्त पुनर्वशीत गोठणगाव येथे झालेल्या कार्यक्रमाला प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, विद्यापीठाचे अंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता व ग्राम चलो अभियानाचे नोडल अधिकारी डॉ. प्रशांत कडू, कुही तालुका तहसीलदार शरद कांबळे, टेक इट आयडियाज नागपूरचे व्यवस्थापकीय संचालक श्री. प्रताप शुक्ला, गोसेखुर्द प्रकल्पग्रस्त कौशल्य विकास कार्यक्रम स्थानिक समन्वयक अनुप रेडके, पांढरगोटा येथील भरारी फाउंडेशनचे संचालक रमाकांत शेंडे, राजोली येथील माजी उपसरपंच उत्तम देशपांडे, वेलगाव येथील माजी उपसरपंच परमानंद शेंडे, दहेगाव येथील माजी उपसरपंच जितू गोंडाने, नवेगाव येथील तंटामुक्ती समिती अध्यक्ष अजय चफाले, वेलतूर येथील सामाजिक कार्यकर्ता शरद सहारे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या संकल्पनेतून शताब्दी पर्व निमित्त 'ग्राम चलो अभियान' राबविले जात आहे. या अभियानाच्या माध्यमातून स्थानिक स्तरावर उपलब्ध नैसर्गिक संसाधनाचा वापर करून रोजगार व स्वयंरोजगाराची साधने ग्रामीण भागात उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या अभियानाच्या माध्यमातून केला जात आहे. या अभियान अंतर्गत प्रकल्पग्रस्त भागामध्ये विद्यापीठाच्या वतीने यापूर्वी तीन बैठका घेण्यात आल्या. त्यानंतर येथील गरज लक्षात घेता सुशिक्षित युवकांसाठी माहिती तंत्रज्ञान कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्याचे निश्चित करण्यात आले. गोठणगाव येथे ५० युवकांच्या माहिती तंत्रज्ञान कौशल्य विकास प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. माहिती तंत्रज्ञान कौशल्य विकास प्रशिक्षण १५ दिवसाचे राहणार आहे. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या युवकांना विद्यापीठाच्या निरंतर शिक्षण विभागाकडून प्रमाणपत्र दिल्या जातील.

यावेळी पुढे बोलताना प्र-कुलगुरु डॉ. दुधे यांनी ग्रामीण भागातील युवकांमध्ये मोठी क्षमता असल्याचे सांगितले. त्या युवकांच्या क्षमतांना चालना देण्यासाठी माहिती तंत्रज्ञान कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविला जात आहे. राष्ट्रसंतांच्या संकल्पनेनुसार उद्योगक्षम ग्राम निर्माण करण्यासाठी विद्यापीठाकडून हा प्रकल्प राबविण्यात येत असल्याचे डॉ. दुधे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी ग्राम चलो अभियानाचा भाग म्हणून माहिती तंत्रज्ञान कंपनीच्या मागणीनुसार प्रशिक्षणाची भूमिका घेण्यात आली. ग्रामीण भागातील युवकांना नोकरी मिळावी म्हणून क्षमता चॅनलायझेशन व्हावे अशी विद्यापीठाची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन रमाकांत शेंडे यांनी केले तर आभार शरद सहारे यांनी मानले.

## सान्वी, अरमान, उदय, कशीश अव्वल स्थानी - ऑरेंज ऑलिंपिक स्पर्धा

ऑरेंज ऑलिंपिक टीम आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित खेलो नागपूर ऑरेंज ऑलिंपिक स्पर्धेत विविध वयोगटात धावण्याच्या शर्यतीत सान्वी पाठक, अरमान पठाण, उदय मस्के, कशीश भगत यांनी बाजी मारली.विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅक वर झालेल्या या स्पर्धेत १८ वर्षाखालील वयोगटात शंभर मीटर धावण्याच्या शर्यतीत मुलींच्या गटात मॉडर्न स्कूलच्या सान्वी पाठकने अव्वल स्थान पटकावले. सान्वी ने १३. ०१ अशी वेळ नोंदवली. दुसर्या स्थानी बाबा नानकची नम्रता अतकरे तर तिसरे स्थान मोहता स्कूलच्या सुजाता वालदा हिने प्राप्त केले. नम्रताने १३.३९ तर सुजाता ने १७.१६ अशी वेळ नोंदवली.




मुलांच्या गटात एस के पोरवालच्या उदय मस्केने ११.८० अशी वेळ देत अव्वल स्थान पटकावले. द्वितीय क्रमांक राजेंद्र हायस्कूलच्या मंथन किरपालने १२.०१ अशी वेळ देत तर तिसरे स्थान भालेराव हायस्कूलच्या आर्यन जांभुळे याने १२.२० सेकंद वेळ देत पटकाविले. १६ वर्षाखालील मुलांच्या गटात सेंट क्लार्टच्या अरमान पठाण ने १२.१६ अशी वेळ देत अव्वल स्थान पटकावले. द्वितीय स्थान केव्हीएसच्या दर्शिल इलमे याने १२.३४ वेळेसह तर तिसरे स्थान बीकेसीपी च्या आदित्य राचोरेने १२.४५ अशी वेळ देत प्राप्त केले. मुलींच्या गटात अव्वल स्थान भवन्स कोराडीच्या नित्या शर्माने १३. ९३ अशी वेळ देत मिळविले. द्वितीय क्रमांक सेंट क्ल्यारेंटच्या सहेली सिहोरे ने १५.२८ वेळेसह आणि तृतीय स्थान बीकेसीपीच्या तनिष्का चौधरीने १५.५५ अशी वेळ देत प्राप्त केले. १६ वर्षाखालील चारशे मीटर धावण्याच्या शर्यतीत मुलींच्या गटात अव्वल स्थान महात्मा गांधी हायस्कूलच्या कशीश भगत हिने १ मिनिटे २.५ सेकंदाची वेळ नोंदवित प्राप्त केले. दुसरे स्थान प्रोव्हिडन्स स्कूलच्या रिद्धीमा बोमटेने १ मिनिटे १४.६ सेकंद वेळेसह आणि तृतीय क्रमांक भवन्स च्या मीरा क्षीरसागरने १ मिनिटे १८.६५ सेकंदासह प्राप्त केले.

मुलांच्या गटात भवन्स आष्टीच्या रिषभ मानकरने ५७.७२ अशी वेळ देत सुवर्ण पदक आपल्या नावे केले. तर द्वितीय स्थान सेंट क्ल्यारेंट च्या यश जाचक ने १ मिनिटे ०.७७ सेकंद वेळेसह आणि तृतीय क्रमांक बीकेसीपीच्या समीर देशमुखने प्राप्त १ १.६१ सेकंदासह प्राप्त केले. चार बाय शंभर मिश्र रिले शर्यतीत बीकेसीपीईने ५६.७२ अशी वेळ देत बाजी मारली. द्वितीय क्रमांक बुटीबोरीच्या सेंट क्लार्टने ५७.६३ सेकंदासह प्राप्त केले.

## रिलेमध्ये बीकेसीपी, सेंट क्लार्टने मारली बाजी - ऑरेंज ऑलिम्पिक स्पर्धा

ऑरेंज ऑलिम्पिक टीम आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित खेलो नागपूर ऑरेंज ऑलिम्पिक स्पर्धेत ४ बाय १०० मीटर रिले स्पर्धेत मुलींच्या गटात बीकेसीपी तर मुलांच्या गटात सेंट क्लार्ट संघाने बाजी मारली.विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅक वर झालेल्या या स्पर्धेत १२ वर्षांखालील मुलींच्या गटात रिले स्पर्धेत बीकेसीपीच्या संघाने १ मि. ७.५४ अशी वेळ देत अव्वल स्थान प्राप्त केले. तर द्वितीय स्थान भगवती मुलींची शाळेने १ मि. ७.८४ सेकंदासह तर तिसरे स्थान सेंट क्लार्ट संघाने १ मि. १०.५० सेकंद वेळ नोंदंवित प्राप्त केले. मुलांच्या गटात सेंट क्लार्ट संघाने १ मि. ४.२३ अशी वेळ नोंदवित अव्वल स्थान तर बीकेसीपीने १ मि. ५.३९ सें. अशी वेळ नोंदवित दुसरे स्थान आणि एसएफएस संघाने १ मि. ७.१९ अशी वेळ देत तिसरे स्थान प्राप्त केले. १६ वर्षांखालील मुलींच्या गटात सेंट क्लार्टने १ मि. २.१ सेकंद अशी वेळ देत अव्वल स्थान तर द्वितीय स्थान १ मि. ४.१ सेकंदासह बीकेसीपीने आणि तिसरे स्थान भगवती शाळेने १ मि. ४.३५ सें. अशी वेळ नोंदवित प्राप्त केले. मुलांच्या गटातही सेंट क्लार्टने ५१.०३ अशी वेळ नोंदवित अव्वल स्थानासह दुहेरी यश प्राप्त केले. बीकेसीपीने दुसरे तर आरएस मुंडलेने तिसरे स्थान प्राप्त केले.

१२ वर्षांखालील मुलींच्या गटात ६० मीटर धावण्यात एसडीए स्कूलच्या आर्या चौबेने ९.०३ अशी वेळ नोंदवित सुवर्णपदक तर पोद्दार इंटरनॅशनलच्या अरुणा मोखाडेने रौप्य आणि कांस्यपदक बीकेसीपीच्या भुमि सिंगने प्राप्त केले. मुलांच्या गटात भवन्सच्या सत्यजीत आष्टेने ८.८८ अशी वेळ देत अव्वल स्थान तर दुसरे स्थान प्रहार मिलिटरीच्या नयन भावसागरने आणि तिसरे स्थान सेंट क्लार्टच्या प्रथमेश कळसकरने प्राप्त केले. २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत १२ वर्षांखालील मुलांच्या गटात महात्मा गांधी शाळेच्या झीशान खानने ३०.५१ अशी वेळ देत सुवर्णपदक मिळविले. रौप्यपदक स्वामीनारायण शाळेच्या प्रदुम्न देशमुखने ३२.१० सेकंद वेळेसह आणि कांस्यपदक सोमलवार शाळेच्या वंश मोहितकरने ३२.६३ अशी वेळ देत प्राप्त केले. मुलींच्या गटात एसडीए शाळेच्या आर्या चौबेने ३१. ३१ अशी वेळ देत अव्वल स्थान तर प्रोव्हिडन्स मुलींची शाळेच्या राशी आसटकरने ३१.५८ अशी वेळ देत रौप्य आणि कांस्यपदक डीपीएस लाव्याच्या स्वरा हिवसेने ३३.४० अशी वेळ देत प्राप्त केले. १६ वर्षांखालील मुलींच्या गटात भवन्स कोराडीच्या नित्या शर्माने २९.१५ अशी वेळ देत सुवर्णपदक तर आलिशा मानने ३१.६६ अशी वेळ देत रौप्य आणि कांस्यपदक भवन्सच्या मीरा क्षीरसागरने ३२.१८ या वेळेसह प्राप्त केले. मुलांच्या गटात सेंट क्लार्टच्या अरमान पठाणने २४.६९ अशी वेळ देत सुवर्ण पदक तर बीव्हीएम आष्टीच्या रिषभ मानकरने २४.९३ अशी वेळ रौप्य आणि भवन्सच्या आयुष वालदेने २५.४८ अशी वेळ देत कांस्यपदक प्राप्त केले. १४ वर्षांखालील मुलांच्या ४ बाय १०० मीटर रिले स्पर्धेत प्रहार मिलिटरी स्कूलने ५५.४५ अशी वेळ देत अव्वलस्थान तर सेंट क्लार्टने ५७.१२ अशी वेळ देत दुसरे आणि बीकेसीपीने ५९.०४ अशी वेळ देत तिसर स्थान प्राप्त केले. मुलींच्या गटात सेंट क्लार्टने तर दुसरे स्थान बीकेसीपीने आणि तिसरे स्थान भगवती मुलींच्या शाळेने प्राप्त केले.




# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला संघाला सुवर्णपदक

## पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ बुद्धिबळ स्पर्धा

एचएसएनसी विद्यापीठ मुंबईद्वारा आयोजित एआययूच्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ महिलांच्या स्पर्धेत दमदार खेळाच्या जोरावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला संघाने सुवर्णपदक आपल्या नावे केले आहे.

स्पर्धेत ५० विद्यापीठाचे जवळपास २५० खेळाडू सहभागी झाले होते. यात शेवटच्या फेरीत नागपूरच्या खेळाडूंनी सर्वाधिक ग्रेड प्राप्त करीत विजेतेपद प्राप्त केले. द्वितीय स्थान मुंबई विद्यापीठाने तर तिसरे स्थान पुण्याच्या भारती विद्यापीठाने मिळविले. स्पर्धेत दमदार कामगिरी करणाऱ्या रातुम नागपूर विद्यापीठाच्या मृदुल डेहनकरला सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून सन्मानित करण्यात आले. स्पर्धेतील विजेत्यांना भारतीय विद्यापीठ संघाचे निरीक्षक डॉ. आर. के. शर्मा यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान एचएनसीचे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. भगवान बलानी यांनी भूषविले. याप्रसंगी डॉ. तेजश्री शानबाग, प्रफुल जव्हेरी, संदेश नागरनायक,जयश्री डांगचे आदी उपस्थित होते. विजयी संघात सेंट विन्सेट पलोटी अभियांत्रिकी महाविद्यालयाची मृदुल डेहनकर, तनया पांडे, सीया ठाकरे, मैथीली खुजे (तिन्ही रामदेव बाबा अभियांत्रिकी महाविद्यालय), गायत्री पाणबुडे(सिटी प्रिमियर कॉलेज), रिद्धी पालोरकर(हिस्लॉप कॉलेज) यांचा समावेश होते. नागपूर महिला संघाने प्रशिक्षक जीत ठाकरे व संघ व्यवस्थापक डॉ. प्रतिभा पवार यांच्या मार्गदर्शनात हे यश प्राप्त केले. याच कामगिरीच्या जोरावर नागपूर विद्यापीठ महिला संघ अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. विद्यापीठाच्या महिला संघाने मिळविलेल्या यशाबद्दल विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी समाधान व्यक्त केला असून विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे आणि कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी अभिनंदन करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहे.

# सेंट क्लार्ट, शकुंतला पब्लिक स्कूलला सर्वसाधारण जेतेपद - ऑरेंज ऑलिम्पिक स्पर्धा





दमदार खेळाच्या जोरावर ऑलिम्पिक टीम आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित खेलो नागपूर ऑरेंज ऑलिम्पिक स्पर्धेत ॲथलेटिक्स स्पर्धेत सेंट क्लार्टने तर टेबल टेनिसमध्ये शकुंतला पब्लिक स्कूलने सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त केले आहे.

रवी नगरातील विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकवर पार पडलेल्या मैदानी स्पर्धेत सेंट क्लार्ट शाळेने ७९ गुणांसह सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त केले. स्पर्धेत सेंट क्लार्टने ११ सुवर्ण, प्रत्येकी सहा रौप्य व कांस्यपदक प्राप्त केले. दुसरे स्थान ६५ गुणांसह बीकेसीपीने तर २० गुणांसह तिसरे स्थान प्रहार मिलिटरी शाळेने प्राप्त केले.

टेबलटेनिस स्पर्धेत शकुंतला पब्लिक स्कूलने १६ गुणांसह स्पर्धेतील सर्वसाधारण जेतेपद प्राप्त केले. या शाळेने तीन सुवर्ण, एक कांस्यपदकासह चार पदके प्राप्त केले. तर द्वितीय स्थान सिव्हील लाईन्स येथील भवन्स शाळेने १३ गुणांसह प्राप्त केले. बी. आर. मुंडले शाळा तिसऱ्या स्थानी राहिली. टेबलटेनिस स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलांच्या एकेरीत तेजस वासनिकरने सार्थ शास्त्रीला ११-९, ११-८, ८-११, ११-७ ने नमवित सुवर्णपदक प्राप्त केले. मुलींच्या गटात शर्वरी खोब्रागडेने ३-१ ने अन्विशा कश्यपला नमवित सुवर्ण यश मिळविले. १३ वर्षांखालील मुलांच्या अंतिम फेरीत सार्थ शास्त्रीने मानस शर्माला ११-५, ११-२, ११-५ ने नमवित सुवर्णपदक प्राप्त केले. १५ वर्षांखालील मुलींच्या अंतिम फेरीत शर्वरी खोब्रागडेने ११-६, ११-६, ११-६ ने साक्षी अरोराला नमवित सुवर्ण यश मिळविले. १३ वर्षांखालील मुलींमधे साची मते ने केविका नंदेश्वरला नमवित बाजी मारली. स्पर्धेत ॲथलेटिक्स स्पर्धेतील विजेत्यांना नागपूर

नागपूर ॲथलेटिक्स संघटनेचे अध्यक्ष गुरुदेव नगराळे व संघटनेचे वरिष्ठ सहसचिव राम वाणी यांच्या हस्ते तर टेबलटेनिस स्पर्धेतील विजेत्यांना नागपूर जिल्हा टेबलटेनिस संघटनेचे सचिव ॲड. आशुतोष पोतनीस यांच्याहस्ते सन्मानित करण्यात आले. स्पर्धेचे आयोजन विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी नागपूर जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेच्या सहसचिव अर्चना कोट्टेवार, गणेश वाणी, ऑरेंज ऑलिम्पिकचे दिव्या चावला, केतन कावरे, टेबलटेनिस संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न केले.

## फोटोग्राफीतून अवतरले मनातील तरंग

### विद्यापीठाच्या ललित कला विभागात फोटो प्रदर्शनी - आयक्यूएसी व एमएसएफडीए यांचे संयुक्त आयोजन





राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ललित कला विभागामध्ये फोटोग्राफी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. विद्यापीठाचा आयक्यूएसी विभाग व महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (एमएसएफडीए) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेचा समारोप फोटो प्रदर्शनीने रविवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२३ रोजी झाला. मनातील तरंग फोटोग्राफीत अवतरल्याचे प्रदर्शनीमधील छायाचित्रांमधून दिसून आले. विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी व प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी भेट देत फोटो प्रदर्शनीची पाहणी केली. ललित कला विभागात आयोजित फोटो प्रदर्शनी उद्घाटन प्रसंगी विद्यापीठ आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य, ललित कला विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात, फोटो जर्नलिस्ट शेखर सोनी, कार्यशाळेचे प्रशिक्षक पद्मश्री सुधारक ओळवे (मुंबई), डॉ. यश अलोणे, निर्माण चौधरी, भारतीय चित्रपट अभ्यासक अमृत गांगर, एमएसएफडीएचे व्यवस्थापक श्री. प्रतीक ढमाल, सहाय्यक गौरव पवार यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. उद्घाटनानंतर कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी व प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी कार्यशाळेत उपस्थित प्रशिक्षणार्थींनी काढलेल्या छायाचित्रांच्या प्रदर्शनीची पाहणी केली. विद्यापीठाच्या शैक्षणिक परिसरातील बहुतांश छायाचित्रे एका वेगळ्या अँगलने काढलेली बघून त्यांनी कौतुक केले. राज्याच्या विविध भागातून सहभाग घेतलेल्या प्रतिनिधींसाठी एक विषय देत 'शॉर्ट फिल्म मेकिंग' स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत १५ टीमने सहभाग घेतला. शॉर्ट फिल्म स्पर्धेत डॉ. नीलिमा चारडे (नागपूर) व प्रा. पोपट माने यांच्या 'अंतर्मन' या शॉर्ट फिल्मने प्रथम क्रमांक पटकाविला. मुंबई येथील जेनिफर बारला व मार्टिन मलुरी यांच्या टीमने तयार केलेल्या 'खत' या शॉर्ट फिल्मने द्वितीय तर संभाजीनगर येथील तुषार जाधव व कुशल बाबीस्वाल यांच्या टीमने तयार केलेल्या 'समवन यू लव' या शॉर्ट फिल्मने तृतीय क्रमांक प्राप्त केला. या स्पर्धेचे परीक्षण अनोख्या पद्धतीने करण्यात आले. ललित कला विभागातील सफाई कामगार कल्पना वाघाडे, सपना खंडारे व भौतिकशास्त्र विभागातील कुलदीप हटवार यांच्या मार्फत स्पर्धेचे परीक्षण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ललित कला विभागातील कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. शॉर्ट फिल्म स्पर्धेतील विजेत्यांना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.




## स्वराज्याच्या प्रक्रियेतून संविधान निर्मिती
## डॉ. गौतम कांबळे यांचे प्रतिपादन

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात 'संविधान दिन'

स्वराज्याच्या प्रक्रियेतून संविधानाची निर्मिती झाल्याचे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी येथील माजी अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. गौतम कांबळे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसरातील दीक्षांत सभागृहात रविवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ११ वाजता संविधान दिनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. कांबळे बोलत होते.

विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. गौतम कांबळे (नागपूर), प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. मंगेश पाठक यांची उपस्थिती होती. रोजच्या जगण्याशी संबंधित असा मार्मिक विषय असल्याचे सांगत संविधान नसते, तर काय झाले असते? असा प्रश्न डॉ. कांबळे यांनी पुढे बोलताना उपस्थित केला. संविधान दिनी सैद्धांतिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक बाजू समजावून घेण्याचा प्रयत्न करणार असल्याचे ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषण करताना माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी संविधानातील तरतुदी माहिती असणे हे नागरिकाचे कर्तव्य असल्याचे सांगितले. देशातील बहुतांश जनता ग्रामीण भागात राहत असून उदरनिर्वाहासाठी त्यांची धडपड असते. शिक्षण पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे या वंचित घटकाला संविधानातील अधिकाराबाबत जागृत करण्याचे महत्त्वपूर्ण काम आपणास करावयाचे आहे. पुस्तकातील ज्ञानाचा उपयोग प्रत्यक्षात कसा करता येईल. याबाबत विद्यापीठाने प्रयत्न सुरू केले आहे. 'ग्राम चलो अभियाना'च्या माध्यमातून गावातील वंचित घटकाला 'लोकल डेमोक्रसी'च्या माध्यमातून जोडण्याचा प्रयत्न केल्या जाणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेत निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना त्यांच्या अधिकाराबाबत 'लोकल डेमोक्रसी'च्या माध्यमातून प्रशिक्षित केले जाणार असल्याचे कुलगुरूंनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. मंगेश पाठक यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले. संविधान दिनाच्या कार्यक्रमाला विविध प्राधिकारणीचे सदस्य, विभाग प्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



# महारोजगार मेळाव्यातून उद्योजक बनण्याची संधी

## कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी घेतला आढावा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि महाराष्ट्र शासनाचा कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महारोजगार मेळाव्यातून तरुणांना उद्योजक बनण्याची संधी प्राप्त होणार आहे. उद्योग निर्माण करण्याकडे कल असलेल्या विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्याचे आवाहन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी केले. महारोजगार मेळाव्याच्या अनुषंगाने विद्यापीठाच्या सभाकक्षात विविध महाविद्यालयांतील रोजगार व प्रशिक्षण अधिकाऱ्यांची बैठक बुधवार, दिनांक २२ नोव्हेंबर २०२३ रोजी पार पडली. बैठकीत कुलगुरूंनी याबाबत सूचना दिल्या. कौशल्य, विकास, रोजगार व नाविन्यता विभाग अंतर्गत महाराष्ट्र शासनातर्फे राज्यस्तरीय नमो महारोजगार मेळाव्याचे आयोजन दिनांक ९ आणि १० डिसेंबर रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथे जमनालाल बजाज प्रशासकीय भवन परिसरात केलेले आहे. विद्यापीठ रोजगार व प्रशिक्षण विभागाच्या वतीने आयोजित बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ सुभाष चौधरी होते. यावेळी अधिसभा सदस्य विष्णू चांगदे, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे उपायुक्त प्रकाश देशमाने, विद्यापीठ रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे सहा. आयुक्त सुनंदा बजाज, उपसंचालक किरण मोटघरे, सामाजिक कार्यकर्ता शिवानी दाणी यांची उपस्थिती होती. अभियांत्रिकी, वाणिज्य व व्यवस्थापन, औषधी निर्माण तसेच विज्ञान महाविद्यालयातील रोजगार व प्रशिक्षण अधिकारी यांच्यासोबत साहचर्य असलेल्या उद्योजकांकडे असलेल्या रिक्त पदांबाबत माहितीचे आदान -प्रदान व्हावे आदी विषयांवर बैठकीत चर्चा करण्यात आली. या अनुषंगाने आयोजित बैठकीत कुलगुरू डॉ. चौधरी आणि सहाय्यक आयुक्त कौशल्य, व्यवसाय विभाग नागपूर यांनी संबोधित केले. अभियांत्रिकी, वाणिज्य व व्यवस्थापन, औषधी निर्माण तसेच विज्ञान महाविद्यालयातील रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. प्रशांत माणूसमारे, विजया रबडे, मोना चांडक, वीरेंद्र दिसावल, डॉ. कुणाल पारेख, प्रफुल्ल दाते, एम. टी. गजभिये, डॉ. प्रवीण पालकर, डॉ. असिम पर्तबे, डॉ. एस. बी. चिंचोळकर, डॉ. एस.एस. जोगी, पी. सी. रहाटे, अमित बनकर, देवेंद्र होले, ललित पुंड, मनिष कुदळे, नेहा लालवाणी यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांची बैठकीला उपस्थिती होती.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या

# कल्याणी, खुशीला रौप्यपदक

### दक्षिण- पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धा

चंदीगढ विद्यापीठ मोहालीच्या अधिपत्याखाली सुरु असलेल्या दक्षिण- पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिलांच्या कुस्ती स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कल्याणी मोहोड आणि खुशी राणी यांनी दमदार खेळाच्या जोरावर रौप्यपदक प्राप्त केले. स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सहा खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करीत अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कुस्ती स्पर्धेत आपले स्थान निश्चित केले आहे.

स्पर्धेत महिला फ्री स्टाईल प्रकारात ५७ किलो वजन गटात रामटेकच्या एसएनटी कॉलेजच्या कल्याणी मोहोडची अंतिम लढत कोल्हापुरच्या शिव अंजलीसोबत झाली. अटीतटीच्या या लढतीत कोल्हापूरची खेळाडूने कल्याणीला नमवित बाजी मारली. परिणामी कल्याणीला रौप्य पदकावरच समाधान मानावे लागले. याशिवाय ६२ किलो वजन गटात माधुरीताई शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या खुशी राणीला मुंबईच्या वैष्णवीकडून पराभव स्वीकारावा लागला. उप महाराष्ट्र केसरी असणाऱ्या वैष्णवीला खुशीने चांगलीच लढत दिली. परंतु शेवटी तिला रौप्यपदकावरच समाधान मानावे लागले. याशिवाय स्पर्धेत ५३ किलो वजनगटात माधुरीताई शारी. शिक्षण महाविद्यालयाच्या अंजलीने ७२ किलो वजनगटात नाशिकराव तिरपुडे महाविद्यालयाची निकीता लांजेवार, ६८ किलो वजनगटात जेसीपीईची मनिषा शर्मा, ७६ किलो वजनगटात एनएसएसएमच्या निशाने चांगला खेळ करीत ४ ते ११ डिसेंबर दरम्यान मोहाली येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत आपले स्थान निश्चित केले आहे.

महिला कुस्तीपटूंनी प्रशिक्षक नीलेश राउत यांच्या मार्गदर्शनात हे यश प्राप्त केले. खेळाडूंनी मिळविलेल्या या यशाबद्दल नागपूर विद्यापीठ क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी समाधान व्यक्त केले आहे. खेळाडूंच्या कामगिरीबद्दल राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी त्यांचे अभिनंदन करीत पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहे.

TheHitavada
Nagpur City Line | 2023-11-01 | Page- 7
ehitavada.com





■ Staff Reporter

VARIOUS organisations paid tributes to former Prime Minister of India Indira Gandhi on her death anniversary. The organisations also paid their respects to Sardar Vallabhbhai Patel on his birth anniversary.

## Central Railway

A RUN for unity rally was organised by Central Railway to celebrate the birth anniversary of Sardar Vallabhbhai Patel on Tuesday. The day is also celebrated as Rashtriya Ekta Diwas by the railways. A pledge taking ceremony was organised in the presence of Rupesh Chandekar, Additional Divisional Railway Manager, Nagpur.

## RTMNU

DR SANJAY Dudhe and Dr Sanjay Hiwse with teachers and staff of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University (RTMNU), paid their respects to Indira Gandhi and Sardar Vallabhbhai Patel at a programme organised at Jamnalal Bajaj Administrative Building, University Campus.

## Congress' Minority Department

MEMBERS of Congress Minority Department paid their tributes to former Prime Minister Indira Gandhi at its party office located at Ahbab Colony, Jafar Nagar. Owes Qadri, Javed Pathan, Tajuddin Samir Qazi, Sayyed Mumtaz, Tauseef Pathan, Sayyed Parwez, Parwez Ali, Tanveer Ahmad, Sanket Sawarkar, Ejaz Khan, Haresh Pal, Raj Marco were present.

## NMC

CHIEF ENGINEER Rajiv Gaikwad, Deputy


Powered by iDocuments


# मैदानात अव्वल 'जेसीपीई'

## भोयर, दोहतरे, तिवारी उत्कृष्ट खेळाडू, नागपूर विद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धा

**म.टा.प्रतिनिधी,** नागपूर




आंतरमहाविद्यालयीन ॲथलेटिक्स स्पर्धेत विजयी खेळाडूंसह उपस्थित मान्यवर.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा विभागातर्फे घेण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन ॲथलेटिक्स स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद ज्योतिबा कॉलेज ऑफ फुले एज्युकेशनने पटकावले. एस. बी. सिटी महाविद्यालयाने ८० गुणांसह दुसरे तर गोंदियाच्या साकेत शारीरिक शिक्षण महाविद्यालयाने ६० गुणांसह तिसरे स्थान प्राप्त केले. नागपूर विद्यापीठाच्या नव्या सिंथेटिक ट्रॅकवर या स्पर्धा घेण्यात आल्या.

महिलांच्या गटात जेसीपीई नागपूर संघाने ४६ गुणांसह अव्वल स्थान पटकावले. दुसरे स्थान एस. बी. सिटी संघाने ३१ गुणांसह आणि तिसरे स्थान लाखनीच्या समर्थ महाविद्यालयाने २४ गुणांसह प्राप्त केले. पुरुषांच्या गटात ४१ गुणांसह नागपूरच्या एस.बी. सिटी महाविद्यालयाने अव्वल स्थान तर गोंदियाच्या साकेत महाविद्यालयाने ३८ गुणांसह दुसरे स्थान प्राप्त केले. ३३ गुणांसह जेसीपीई नागपूर संघ तृतीय स्थानी राहिला.

कॅम्पस कनेक्ट

स्पर्धेत महिला गटात उत्कृष्ट ॲथलिट्स म्हणून एम. एम. विज्ञान महाविद्यालयाची मिताली भोयर आणि चक्रपाणी महाविद्यालयाची रिया दोहतरे तर पुरुष गटात एस. बी. सिटी महाविद्यालयाचा सौरभ तिवारी उत्कृष्ट ॲथलिट्स यांची निवड करण्यात आली. महिला गटात उत्कृष्ट जंपर म्हणून स्वाती उईके तर पुरुष गटात प्राचार्य अरुणराव कलोडे महाविद्यालयाच्या अमन शेंद्रे यांना पुरस्कार देण्यात आला. महिला गटात उत्कृष्ट एन्डुरन्सकरिता मिताली भोयर आणि पीडब्ल्यूएस कॉलेजचा रंजन यादवला गौरविण्यात आले. महिला गटात उत्कृष्ट स्प्रिंटर म्हणून एसएफएस कॉलेजची व्ही. नागेश्वरी पुरुष गटात विद्याभारती महाविद्यालय सेलूच्या आदर्श भुरे याने हा सन्मान प्राप्त केला आहे.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी हरीश पालीवाल, मधुकरराव वासनिक पीडब्ल्यूएस कॉलेजचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटील तर विशेष अतिथी म्हणून विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य डॉ. नितीन जंगीटवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ सदस्य डॉ. धनंजय वेळूकर यांनी भूषविले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांचा पदक, चषक देऊन सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवानिमित्त कार्यरत शारीरिक शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांचा गुलाबपुष्प व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. सोनाली शिरभाते यांनी तर बक्षिसांची घोषणा डॉ. संजय चौधरी यांनी केली. आभार डॉ. आदित्य सोनी यांनी मानले.

## अवती-भवती



### 'योगी अरविंद यांनी जागविली मानवी चेतना'

**नागपूर :** योगी अरविंद यांनी साहित्यातून मानवी चेतना जागविली, असे मत कोलकाताच्या विश्वभारती शांतीनिकेतन येथील इंग्रजीचे माजी प्राध्यापक डॉ. गौतम घोषाल यांनी व्यक्त केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, तर अध्यक्षस्थानी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, विद्यापीठाचे इंग्रजी विभागप्रमुख डॉ. संजय पळवेकर, मानव्यविज्ञान विद्या शाखेचे माजी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय वाटमोडे उपस्थित होते. 'श्री अरविंद यांची योगा, कविता आणि मानवतावाद' विषयावर बोलताना डॉ. घोषाल यांनी योगी अरविंद यांचे साहित्य, सद्यस्थितीतील आवश्यकता याबाबत माहिती दिली. योगी अरविंद यांनी क्रांतिकार्यासह साहित्यामधून सातत्याने मानवी चेतना म्हणजेच मानवाचे अंतर्मन जागृती करण्याचा प्रयत्न केला. गीतेचे मोठे भाष्यकार असल्याने त्यांच्या साहित्यातून कर्म, भक्ती आणि प्रेम यांविषयी लिखाण दिसून येते. अरविंद हे योगी, कवी, लेखक, साहित्यिक, समाजशास्त्रज्ञ याचप्रमाणे मानसशास्त्रज्ञ देखील होते, असे डॉ. घोषाल म्हणाले. डॉ. प्रशांत माहेश्वरी यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविकात डॉ. पळवेकर यांनी व्याख्यानमालेच्या आयोजनामागील भूमिका विषद केली. तसेच व्याख्याते डॉ. गौतम घोषाल यांचा परिचय करून दिला.


नवभारत


प्रस्ताव मान्य, अध्ययन के लिए केआरसी भेजा

# रामदासपेठ में बनेगी 1000 विद्यार्थी क्षमता वाली लाइब्रेरी



■ नागपुर, महानगर संवाददाता. नागपुर विश्वविद्यालय का रामदासपेठ स्थित भाऊसाहब कोलते ज्ञान स्रोत केंद्र (लाइब्रेरी) शहर के मध्य भाग में होने से अध्ययन के लिए छात्रों की पहली पसंद है लेकिन इमारत पुरानी हो गई है. यहां केवल 150 क्षमता का ही विद्यार्थी अध्ययन कक्ष है. बढ़ती संख्या व जरूरतमंद छात्रों की समस्याओं को देखते हुए 1000 क्षमता वाले विस्तारित अध्ययन कक्ष के निर्माण संबंधी प्रस्ताव को सीनेट की बैठक में मान्यता दी गई. विस्तारित योजना पर कार्य करने के लिए प्रस्ताव को नॉलेज रिसर्च सेंटर के पास भेजने का निर्णय लिया गया. सीनेट की बैठक में सदस्य दिनेश शेराम ने यह प्रस्ताव रखा. साथ ही विवि में 15 नवंबर को बिरसा मुंडा जयंती निमित्त 'राष्ट्रीय जनजाति गौरव' दिवस घोषित करने और सभी कॉलेजों में नायक गौरव गाथा कार्यक्रम हर वर्ष आयोजित करने, स्नातक व स्नातकोत्तर पाठ्यक्रम में जनजाति नायक (क्रांतिवीर) का समावेश करने को भी मान्य किया गया. इसे विद्वत परिषद के पास भेजने का निर्णय लिया गया.

### आदिवासी हॉस्टल के लिए समिति

विवि में हर वर्ष देशभर से सैकड़ों विद्यार्थी पढ़ने आते हैं लेकिन वर्तमान में विवि तथा राज्य व केंद्र सरकार के हॉस्टल कम पड़ने लगे हैं. बाहर से आने वाले छात्रों को जगह नहीं मिल पाती. इसके लिए विवि द्वारा समाज कल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग, अन्य पिछड़ा वर्ग कल्याण विभाग से हॉस्टल उपलब्ध कराने और निर्माण कार्य का खर्च भी देने की मांग करने का प्रस्ताव रखा. इस पर चर्चा के दौरान मनमोहन बाजपेयी ने बताया कि यह हॉस्टल भले ही अन्य विभाग की मदद से बनाया जाये लेकिन इसे विवि के अधिकार क्षेत्र में रखना होगा. सदस्य शांता कुमरे ने कहा कि आदिवासी विद्यार्थियों को पढ़ाई का मौका मिला है तो हॉस्टल की भी व्यवस्था की जानी चाहिए. चर्चा पर उपकुलपति ने अपने जवाब में बताया कि फिलहाल विवि के पास जगह की कमी बनी हुई है. अल्पसंख्यक हॉस्टल के लिए ही जगह नहीं मिल रही है. एलआईटी के पृथक होने से विवि के पास जगह की तंगी हो गई है. इस संबंध में एक समन्वय समिति गठित की जाएगी. कमेटी जगह के बारे में जानकारी जुटाएगी. प्रस्ताव को मान्य किया गया.


Nagpur Edition
03-november-2023 Page No. 7
epaper.enavabharat.com



TheHitavada
Nagpur City Line | 2023-11-01 | Page- 6
ehitavada.com


# RTMNU, GHRCE conduct seminar on human devpt




■ Business Reporter

A ONE-DAY seminar on 'Human Development through Science and Technology in the Interest of Society' was successfully organised by the Faculty of Humanities, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University (RTMNU) in association with Faculty of Science and Technology, G H Raisoni College for Engineering (GHRCE), Nagpur on October 31, 2023.

The welcome address was given by Dr Sachin Untawale, Director GHRCE. Opening remarks were given by Dr D M Shende, Department of English, RTMNU. Chief guest of the seminar was Vice Chancellor of RTMNU, Dr Subhash R Chaudhari.

Keynote address was delivered by Dr Sharad Nimbalkar, Former Vice Chancellor, Panjabrao Deshmukh Krishi Vidyapeeth, Akola.

Dr Santosh Jaju, Deputy Director GHRCE proposed a vote of thanks. It was followed by a formal vote of thanks proposed by Dr Shyam Koreti, Dean Faculty of Humanities, RTMNU.

# नागपुर विश्वविद्यालय की पुरुष कबड्डी टीम घोषित

पश्चिम क्षेत्रीय इंटर यूनिवर्सिटी कबड्डी टूर्नामेंट में हिस्सा लेगी टीम



**भास्कर खेल | नागपुर.** देवी अहिल्या फिजिकल एजुकेशन यूनिवर्सिटी, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, खंडवा रोड इंदौर के तत्वावधान में 4 से 8 नवंबर के दौरान होने वाले पश्चिम क्षेत्रीय इंटर यूनिवर्सिटी पुरुष कबड्डी टूर्नामेंट के लिए राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर यूनिवर्सिटी टीम की घोषणा कर दी गई। नागपुर यूनिवर्सिटी के खेल निदेशक डॉ. शरद सूर्यवंशी द्वारा जारी एक विज्ञप्ति में यह जानकारी दी गई है। टीम की घोषणा हाल ही में विश्वविद्यालय के मैदान में आयोजित इंटर-कॉलेज कबड्डी टूर्नामेंट के प्रदर्शन के आधार पर प्राचार्य डॉ. सचिन चपले, प्राचार्य डॉ. समशेर सिंह, डॉ. सविता भोयर और डॉ. मनोज अटक्कर की एक समिति द्वारा की गई।

**पुरुष टीम :** गणेश गायधने, चंदू कन्हालकर, संकेत शेंडे, रोहित डोनोड, इशाक शाह, भूषण वानखेड़े, आदित्य पोंगुल, अभिषेक निंबालकर, हिमांशु केलझरकर, अमित दहिया, मनोज डोंगरे, ऋषभ सयाम।


पुण्यनगरी


City Pulse

## नागपूर विद्यापीठाचा कबड्डी संघ जाहीर



**नागपूर :** खांडवा रोड (इंदोर) येथे देवी अहिल्या शारीरिक शिक्षण विद्यापीठाच्या यजमानपदाखाली ४ ते ८ नोव्हेंबरदरम्यान पुरुषांची पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेसाठी विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संघ जाहीर केला. विद्यापीठ संघ : गणेश गायधने, चंदू कन्हाळकर, संकेत शेंडे, रोहित डोनोडे, इशक शाह, भूषण वानखेडे, आदित्य पोंगूल, अभिषेक निंबाळकर, हिमांशू केळझरकर, अमित दहिया, मनोज डोंगरे, ऋषभ सयाम. राखीव : सूरज दडमल, कुणाल चव्हाण, शुभम बावणे, यश अडगुले, लुकेश सपाट, हर्षद अगोना, मोहम्मद रजा शेख, महेश ढोले.


Smart Nagpur Edition
Nov 3, 2023 Page No. 02
Powered by : eReleGo.com



Powered by iDocuments



देशोन्नती


कॅमेरा लेन्स



रातुम नागपूर विद्यापी
भारताचे प्रथम गृहमंत्री सर
वल्लभभाई पटेल यांची ज
'राष्ट्रीय एकता दिवस' म्ह
साजरी करण्यात आली. त
माजी प्रधानमंत्री स्व. इंदिरा ग
यांच्या पुण्यतिथीनि
आदरांजली अर्पण करण
आली. यानिमित्त सर्व उपस्थि
राष्ट्रीय एकता दिवसा
निमित्ताने शपथ देण्यात आली.
कार्यक्रमास विद्यापीठातील वि
विभागांचे प्रमुख, अधिका
शिक्षक, शिक्षकेतर कर्मचा
विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्
होते. विद्यापीठाच्या जमना
बजाज प्रशासकीय भवना
सभागृहात हा कार्यक्रम आयो
करण्यात आला होता.


Deshonnati Edition
Nov 3, 2023 Page No. 1
Powered by : eReleGo.com



LOKMAT TIMES


# Varsity men's kabaddi team declared

LOKMAT NEWS NETWORK
NAGPUR

Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University has announced the team for West Zone Inter University Kabaddi Tournament to be held from November 4 to 8 at Devi Ahilya Physical Education University, Sports Complex, Khandwa Road Indore.

The team was announced by a committee consisting of Dr. Sachin Chaple, Dr. Samsher Singh, Dr Savita Bhoyar and Dr Manoj Atvkar on the basis of the recently held Inter-College Kabaddi Tournament at the University ground, informs director of Department of Sports and Physical Education of the varsity Dr Sharad Suryawanshi.




RTM Nagpur University men's kabaddi team members before their departure for West Zone Kabaddi Championship to be held at Indore in Madhya Pradesh.

### Team

- Ganesh Gaidhane anmd Chandu Kanhalkar (both from Arts College, Sihora), Sanket Shende (SSNJ Deoli), Rohit Donode (LNPW College, Andhalgaon), Ishaq Shah (Bhiwapur College), Bhushan Wankhede( Haribhau Adamne College, Saoner) ), Aditya Pongul (JCPE, Nagpur), Abhishek Nimbalkar (RB Tidke College, Mauda), Himanshu Kelzarkar (SB City College, Nagpur), Amit Dahiya (Padmashri Ajit Wadkar College, Nagpur), Manoj Dongre (Priyadarshini Engineering College, Nagpur) , Rishabh Sayam (Narayan Kale College, Karanja).


Nagpur First
Page No. 2 Nov 03, 2023
Powered by: erelego.com

# भारतभक्ति ही भारतीयता है : अभय बापट

दबंग स्वर



नागपुर। भारतीय समाज के अन्तिम पंक्ति में खड़े व्यक्ति का दुःख-दर्द यदि हमें व्याकुल कर देता है, तब ही हम अपने आप को भारतभक्त कह सकते हैं। भारत का चिन्तन करना, भारत के उत्थान के लिए कार्य करना, प्रत्येक कार्य में भारत के हित का विचार करना, यही भारतभक्ति है। भारतभक्ति ही वास्तव में भारतीयता है। उक्त विचार व्यक्त करते हुए विवेकानन्द केन्द्र कन्याकुमारी, महाराष्ट्र प्रान्त के प्रान्त प्रमुख अभय बापट, मुंबई ने स्वामी विवेकानन्द के विचारों का मर्म समझाया। वे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय के हिन्दी विभाग द्वारा आयोजित शताब्दी महोत्सव व्याख्यान श्रृंखला के अन्तर्गत 'भारतीयता की अवधारणा और स्वामी विवेकानन्द'

की फुलवारी और बुढ़ापे की काशी है। समाज के प्रति ऐसा उदात्त भाव हम सबके अंतःकरण में होना चाहिए। उन्होंने जोर देकर कहा कि हमें सफल नहीं, सार्थक जीवन जीना चाहिए। स्वामीजी का सन्देश है बलशाली बनो, चरित्रवान बनो और अपने देश से प्रेम करो। राष्ट्र धर्म ही भारत का प्राण है। अध्यक्षीय उद्बोधन में विश्वविद्यालय के प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे ने कहा कि ... खोज में ... स्रोत है। ...श है कि ... भाव से ...र रखें।

प्रास्ताविक रखते हुए हिन्दी वि... डॉ. मनोज पाण्डेय ने कहा वि... जीवन-मूल्य ही भारतीयता ... स्तम्भ हैं। भारतीय संस्कृति ... परम्परा को समझे बगैर भार... मूल्यों को नहीं समझा ... स्वामीजी ने विश्वपटल प... मूल्यों को प्रतिष्ठित किया ... पर मानविकी संकाय के ... शामराव कोरोटी ने आ... हुए कहा कि भारत ... अनुसंधान की भूमि ... के कल्याण की काम... काल से ही भा... कुटुंबकम्ह का सन्...



## भारतीय की अवधारणा और स्वामी विवेकानंद पर व्याख्यान

## भारत भक्ति ही भारतीयता है : बापट



### 'वसुधैव कुटुंबकम्' का संदेश

### अंतःकरण में होना चाहिए

### इनकी रही उपस्थिति

TheHitavada
Nagpur City Line | 2023-11-04 | Page- 8
ehitavada.com

नागपूर. ग्रामविकासासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ ग्रामस्थांसोबत असल्याची ग्वाही कुलगुरू चौधरी यांनी दिली. विद्यापीठाच्या शताब्दी पर्वानिमित्त सावनेर तालुक्यातील दहेगाव रंगारी येथे आयोजित राज्यस्तरीय खंजेरी भजन स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते.

विद्यापीठाचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्र व दहेगाव (रंगारी) येथील अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा घेण्यात आली. उद्घाटन समारंभाला प्र-कुलगुरु दुधे, अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज मोझरी येथील सरचिटणीस जनार्दनपंत बोथे, विद्यापीठ मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता कोरेटी, माजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्र प्रमुख थोटे, पुंडलिकराव चौधरी उपस्थित होते.

कुलगुरू चौधरी म्हणाले की, गावाशी जुळावे या भावनेने विद्यापीठ मंडईच्या माध्यमातून गावागावात पोहोचत आहे. स्थानिक नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर करून गावांमध्ये रोजगार उपलब्ध व्हावे या दृष्टीने विद्यापीठाने कार्य सुरू केले आहे. भंडारा जिल्ह्यात सिल्क क्लस्टर, मधाचे क्लस्टर उभारण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहे. युवकांना रोजगार उभा करण्यास तसेच उत्पादनाच्या विक्रीसाठी देखील विद्यापीठ मदत करणार असल्याचे त्यांनी सांगितले. सोबतच राज्यस्तरीय खंजेरी भजन स्पर्धेत सहभागी स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला गावामधून दिंडी व रामधून फेरी काढण्यात आली. यामध्ये मोठ्या संख्येने ग्रामस्थ सहभागी झाले. प्रास्ताविक कोरेटी यांनी तर संचालन विद्यार्थी स्नेहल वाघमारे याने केले. विजयालक्ष्मी थोटे यांनी आभार मानले.

Orange City Plus Edition
20 November 2023 Page No. 2
epaper.navarashtra.com

LOKMAT TIMES

# Prez Murmu on two-day visit to city



Nagpur: President Droupadi Murmu will be on a two-day visit to Nagpur. She will participate in the inauguration of platinum jubilee celebrations of Government Medical College and Hospital, and in convocation of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University.

GMC and RTMNU are preparing for the President's visit. President Murmu will inaugurate the platinum jubilee celebrations of GMC on December 1. This programme will be held at GMC. The convocation of RTMNU will be held on December 2.

Nagpur First
Page No. 1 Nov 21, 2023
Powered by: erelego.com

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# नागपूर विद्यापीठात 'प्लेसमेंट ड्राईव्ह'

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात अजीम प्रेमजी फाऊंडेशनचा 'प्लेसमेंट ड्राईव्ह' घेण्यात आले. विद्यापीठ रोजगार व प्रशिक्षण विभागाच्या वतीने आयोजित या उपक्रमातून 'रिसोर्स पर्सन' या पदावर माजी विद्यार्थ्यांची नियुक्ती केली जाणार आहे.

विद्यापीठ रोजगार व प्रशिक्षण विभागाच्या वतीने अजीम प्रेमजी फाऊंडेशनने माजी विद्यार्थ्यांकरिता या ड्राईव्हचे आयोजन केले होते. विज्ञान व तंत्रज्ञान, भाषा तसेच मानव विज्ञान विद्या शाखांमधील पदवी आणि पदव्युत्तर पदवीप्राप्त माजी विद्यार्थ्यांकरिता या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

21/11/2023 | Nagpur |

# विद्यापीठाचा दीक्षांत राष्ट्रपतींच्या उपस्थितीत

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

**येत्या २ डिसेंबर रोजी १११वे पदवीदान**



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा १११वा दीक्षांत समारंभ दोन टप्प्यांत पार पडणार असून त्यापैकी पहिला कार्यक्रम २ डिसेंबर रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. दुसऱ्या टप्प्याचा कार्यक्रम २ फेब्रुवारी रोजी डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात लष्करप्रमुख मनोज पांडे यांच्या उपस्थितीत पार पडेल.

राष्ट्रपतींनी दीक्षांत समारंभासाठी केवळ एक तासांचा वेळ दिला असल्याने या समारंभात केवळ ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. रा. ह. तुपकरी यांना डी.लिट. प्रदान करण्यात येईल. उर्वरित २०० सुवर्णपदके आणि १३० पीएच.डी. या २ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या कार्यक्रमात प्रदान केल्या जातील. २ डिसेंबरचा कार्यक्रम याआधी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या परिसरात होणार होता. मात्र, सुरक्षेच्या कारणास्तव तो आता रेशीमबागेतील कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित करण्यात आला असून केवळ निवडक व्यक्तींनाच कार्यक्रमाकरिता प्रवेश दिला जाणार आहे. दुसऱ्या टप्प्यातील २ फेब्रुवारीचा कार्यक्रम डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात होणार आहे.

तब्बल ३८ वर्षांनंतर नागपूर विद्यापीठाच्या कार्यक्रमाला राष्ट्रपती उपस्थित राहणार आहेत. यापूर्वी ज्ञानी झैलसिंग हे १९८५मध्ये राष्ट्रपती असताना नागपूर विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहिले होते. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम आणि प्रतिभा पाटील हे माजी राष्ट्रपती म्हणून विद्यापीठाच्या कार्यक्रमांना उपस्थित राहिले होते.

पुण्य नगरी

# नागपूर विद्यापीठात 'संविधानदिन' रविवारी

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात संविधान दिनाचा कार्यक्रम छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसरातील दीक्षान्त सभागृहात रविवार, २६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून डॉ. गौतम कांबळे (नागपूर) व प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांची उपस्थिती राहणार आहे. भारतीय संविधानाबाबत जागरूकता निर्माण व्हावी या दृष्टीने केंद्र व राज्य सरकारच्या निर्देशानुसार २६ नोव्हेंबर रोजी संविधानदिनाचा कार्यक्रम आयोजित केला जाणार आहे. संविधानदिनाच्या कार्यक्रमाला सर्व शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांनी नियोजित वेळी व स्थळी उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी केले आहे.

Smart Nagpur Edition
Nov 22, 2023 Page No. 04
Powered by : eReleGo.com

अवती-भवती



नागपूर विद्यापीठाच्या 'मंडई'ला सुरुवात

TODAY SakalNews @SakalMediaNews www.esakal.com २

लोकमत

# राष्ट्रसंतांनी खंजिरी भजनाच्या माध्यमातून लोकप्रबोधन केले

## विकास महात्मे : राज्यस्तरीय खंजिरी भजन स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : अभंगदेखील कौशल्यच आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी खंजिरी भजनाच्या माध्यमातून लोकप्रबोधन केले. अभंग हे रंजक शिक्षण आहे. रंजक शिक्षणातून उद्बोधन मनात रुजते. अभंगातून होत असलेले उद्बोधन मनात रुजविण्याचे काम राष्ट्रसंतांनी केले, असे प्रतिपादन माजी खासदार डॉ. विकास महात्मे यांनी केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी पर्वानिमित्त आयोजित राज्यस्तरीय खंजिरी भजन स्पर्धेच्या उद्घाटनीय सोहळ्यात ते बोलत होते. विद्यापीठाचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्र व दहेगाव (रंगारी) येथील अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सावनेर तालुक्यातील दहेगाव (रंगारी) येथे ही भजन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी होते. प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज मोझरी येथील सरचिटणीस जनार्दनपंत बोथे, विद्यापीठ मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्यामराव कोरेटी, माजी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय वाटमोडे, शताब्दी महोत्सव कक्षाचे समन्वयक डॉ. संतोष कसबेकर, ज्ञानेश्वर रक्षक, विद्यापीठ रासेयो संचालक डॉ. सोपानदेव पिसे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे, पुंडलिकराव चौधरी यांची विशेष उपस्थिती होती.

Hello Nagpur
Page No. 3 Nov 20, 2023

# पदव्युत्तर पदवीसाठी वर्षभराचा अभ्यासक्रम

म. टा. प्रतिनिधी, पुणे

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (एनईपी) संदर्भात नव्या पदव्युत्तर पदवी (पीजी) अभ्यासक्रमाचा आराखडा प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार महाविद्यालये, विद्यापीठांना एक आणि दोन वर्षांचा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम किंवा पाच वर्षांचा एकात्मिक अभ्यासक्रम (पदवी आणि पदव्युत्तर पदवी) सुरू करता येणार आहे.

याशिवाय विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार विषय निवडण्याची; तसेच एका विद्याशाखेतून दुसऱ्या विद्याशाखेत जाण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार चार वर्षांचा पदवीचा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना वर्षभराच्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचा पर्याय उपलब्ध होणार आहे. त्याचप्रमाणे तीन वर्षांचा पदवीपूर्व अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना दोन वर्षांच्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येणार आहे. त्याशिवाय पदवी आणि पदव्युत्तर पदवीचा समावेश असलेला एकात्मिक अभ्यासक्रमही विद्यापीठांना तयार करता येणार आहे. त्यामध्ये मशिन लर्निंगसह बहुविद्याशाखीय शिक्षण, आरोग्य निगा, कृषी, विधी अशा व्यावसायिक क्षेत्रांचा समावेश करता येणार असल्याचे प्रा. जोशी यांनी परिपत्रकात नमूद केले आहे.

नवभारत

# दीक्षांत समारोह : एक घंटा रहेंगी राष्ट्रपति

## DSC, Ph.D की होगी घोषणा

■ नागपुर, महानगर संवाददाता. नागपुर विश्वविद्यालय के दीक्षांत समारोह का आयोजन 2 दिसंबर को किया गया है. सुबह 10 बजे से समारोह की शुरुआत होगी. राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू समारोह में 1 घंटे शामिल होंगी. इस दौरान डॉक्टर ऑफ साइंस (डीएससी), पीएच.डी की घोषणा की जाएगी. विश्वविद्यालय प्रशासन समारोह को यादगार बनाने में जुटा हुआ है. विश्वविद्यालय के दीक्षांत में राष्ट्रपति की उपस्थिति ने सभी की उत्सुकता बढ़ा दी है. प्रशासन द्वारा सभी तैयारियां प्रोटोकॉल के दायरे में ही की जा रही हैं. समारोह रेशमबाग स्थित भट सभागृह में होगा. राष्ट्रपति राजभवन से निकलकर सभागृह पहुंचेंगी. सभागृह में दाखिल होने से लेकर 1 घंटे तक वहां रहेंगी.



ये सभागृह के भीतर दीक्षांत रैली में शामिल होंगी. विश्वविद्यालय प्रशासन ने मंच पर 9 अतिथियों के आसन की मंजूरी मांगी है. इनमें राष्ट्रपति मुर्मू, राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री नितिन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजीत पवार, उच्च व तकनीकी शिक्षा मंत्री चंद्रकांत पाटिल, उपकुलपति सुभाष चौधरी, प्र-उपकुलपति संजय दुधे का समावेश रहेगा लेकिन इस बारे में अब तक राष्ट्रपति कार्यालय के ओर से हरी झंडी नहीं मिली है. उल्लेखनीय है कि शताब्दी महोत्सव समारोह में उपराष्ट्रपति आए थे उस वक्त मंच पर केवल 7 आसन की व्यवस्था को मंजूरी दी गई थी.

### मंच पर नहीं होंगे डीन

मंच पर किसी भी फैकल्टी के डीन नहीं होंगे. डीन सभागृह में पहली कतार में बैठेंगे, जबकि डीएससी और पीएच.डी धारकों की घोषणा वहीं से की जाएगी. समारोह में मेधावी छात्रों को पुरस्कार और मेडल नहीं दिए जाएंगे. समारोह में अतिथियों के भाषण के बाद राष्ट्रपति का मुख्य भाषण होगा. सुरक्षा के मद्देनजर सभी तरह के इंतजाम किए जाएंगे. समारोह में शामिल होने वालों को भी प्रोटोकॉल का पालन करना अनिवार्य होगा.

*विश्वविद्यालय के दीक्षांत समारोह में राष्ट्रपति का शामिल होना अभिमान का विषय है. यही वजह है कि प्रशासन की ओर से योग्य नियोजन और तैयारियां की जा रही हैं. छात्रों को पुरस्कार और मेडल देने के लिए एक महीने बाद कार्यक्रम आयोजित किया जाएगा.*

*- प्रा. सुभाष चौधरी, उपकुलपति, नागपुर विश्वविद्यालय*

Nagpur Edition
23-november-2023 Page No. 1
epaper.enavabharat.com

डॉ. शरद निंबाळकर : राज्यस्तरीय खंजिरी भजन स्पर्धेचा समारोप

# राष्ट्रसंतांच्या साहित्यावर चिंतन होण्याची गरज

सकाळ वृत्तसेवा



पारितोषिक प्राप्त भजनी मंडळ

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# ग्रामगीतेच्या स्वरूपात देशाच्या विकासाचा आराखडा

डॉ. शरद निंबाळकर यांचे प्रतिपादन; राज्यस्तरीय भव्य खंजिरी स्पर्धेचा समारोप

लोकसत्ता खास प्रतिनिधी



नागपूर : देश खऱ्या अर्थाने समृद्ध व्हायचा असेल तर गावाचा विकास होणे आवश्यक असल्याचे राष्ट्रसंतांचे म्हणणे होते. ग्राम विकासाची खरी दिशा देणारी ग्रामगीता राष्ट्रसंतांनी ग्रामनाथाला अर्पण केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेच्या रूपाने देशाच्या विकासाचा आराखडा दिला, असे प्रतिपादन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर यांनी केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दीपर्वा निमित्त सावनेर तालुक्यातील दहेगाव (रंगारी) येथे आयोजित वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज भव्य राज्यस्तरीय खंजिरी भजन स्पर्धेचा समारोप रविवारी सायंकाळी पार पडला. यवतमाळ जिल्ह्यातील हस्तापूर येथील सार्थक गुरुदेव सेवा मंडळाने खंजिरी भजन स्पर्धेतील २५ हजार रुपयांचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार पटकावला. कार्यक्रमाला कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, अधिष्ठाता प्रशांत कडू उपस्थित होते. डॉ. निंबाळकर म्हणाले, राष्ट्रसंतांच्या या साहित्यावर चिंतन होण्याची गरज आहे. ग्रामगीतेच्या माध्यमातून वेदनेचा हा वेद निर्माण झाल्याचे ते म्हणाले. शक्ती, संपत्ती नसल्याने गावे आज ओसाड झाली आहेत. गावातील तरुणांनी गावामध्ये रक्षक दल निर्माण करणे गरजेचे आहे. शिक्षण घेतलेल्यांनी गावात येत येथील विकासाकडे लक्ष देण्याचे आवाहन यांनी केले. महाराजांनी सांगितलेले बंधुत्व, दातृत्व व मातृत्व याची शिकवण देणारा मानवता धर्म कळणारे आणि वळणाऱ्या कार्यकर्त्यांची गरज त्यांनी व्यक्त केली.

डॉ. सुभाष चौधरी अध्यक्षीय भाषणातून म्हणाले की, कौशल्य विकासाचे मार्गदर्शन मिळत रोजगार-स्वयंरोजगार प्राप्त व्हावा आदी सर्व दृष्टीने विद्यापीठाने कार्य सुरू केले आहे. ग्रामस्थांनी या अभियानाचे घटक व्हावे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांनी केले. तत्पूर्वी सातत्याने दोन दिवस खंजिरी भजन स्पर्धेचे परीक्षण करणारे परीक्षक हिंगणघाट येथील श्रीकांत आवारे, दिलीप झाडे (प्रचारक) व कळमेश्वर येथील उमेश्वर बारापात्रे यांचा प्रमुख अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

21/11/2023 | Nagpur | Page : 08
Source : https://epaper.loksatta.com

Apla Nagpur | 2023-11-19 | Page- 3
epaper.tarunbharat.net

# ॲथ्लेटिक्स स्पर्धेत कलोडे महाविद्यालयाला यश



◆ नागपूर, १८ नोव्हेंबर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाद्वारे आयोजित आंतरमहाविद्यालयीन ॲथ्लेटिक्स स्पर्धेत कलोडे महाविद्यालयाने यश प्राप्त केले.

स्पर्धेत महाविद्यालयाची धावपटू नेहा डबाले ४०० मीटर धावण्याच्या शर्यतीमध्ये नवीन विक्रमाची नोंद केली. तसेच ४०० मीटर हर्डल्समध्येही नवीन विक्रम केला. महाविद्यालयाचा नयन सरडे ११० मीटर अडथळ्याच्या शर्यतीत सुवर्णपदक, तसेच ४ बाय १०० मिक्स रिलेमध्ये महाविद्यालयाने सुवर्णपदक प्राप्त केले. तिहेरी उडीत अमन शेंद्रे याने सुवर्णपदक प्राप्त केले. महाविद्यालयाची धनश्री कामटे हिने १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत रौप्यपदक प्राप्त केले. प्रज्वलने ४०० मीटर अडथळ्याच्या शर्यतीमध्ये रौप्यपदक, अनिकेत जाधवनेसुद्धा ४०० मीटर अडथळ्याच्या शर्यतीमध्ये कांस्यपदक प्राप्त केले. स्पर्धेत महाविद्यालयाला ५ सुवर्ण, २ रौप्य आणि २ कांस्य अशी एकूण ९ पदके प्राप्त झाली आहेत. यशस्वी खेळाडूंनी यशाचे श्रेय संस्थेचे अध्यक्ष ओमकार उमाटे, सचिव किशोर उमाटे, माजी प्राचार्य डॉ. सातपुते, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, प्रशिक्षक समशेर खान आणि महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. नितीन जंगीतवार यांना दिले आहे. (तभा वृत्तसेवा)

नवराष्ट्र

# अजीम प्रेमजी फाऊंडेशनचा प्लेसमेंट ड्राईव्ह

## रातुम नागपूर विद्यापीठात आयोजन



नागपूर. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात अजीम प्रेमजी फाऊंडेशनचा प्लेसमेंट ड्राईव्ह रविवारी पार पडला. विद्यापीठ रोजगार व प्रशिक्षण विभागाच्या वतीने आयोजित प्लेसमेंट ड्राईव्ह मधून रिसोर्स पर्सन या पदावर माजी विद्यार्थ्यांची नियुक्ती केली जाणार आहे. विद्यापीठ रोजगार व प्रशिक्षण विभागातर्फे अजीम प्रेमजी फाऊंडेशनने माजी विद्यार्थ्यांकरीता या ड्राईव्हचे आयोजन केले होते. विज्ञान व तंत्रज्ञान, भाषा तसेच मानव विज्ञान विद्या शाखांमधील पदवी आणि पदव्युत्तर पदवी प्राप्त माजी विद्यार्थ्यांकरीता या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या पदासाठी पदवीधर माजी विद्यार्थ्यांना शिकविण्याचा 5 वर्षे तर पदव्युत्तर पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना 2 वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे. कुलगुरू चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरात हा प्लेसमेंट ड्राइव पार पडला. यावेळी विद्यापीठ रोजगार व प्रशिक्षण अधिकारी भूषण महाजन, अजीम प्रेमजी फाउंडेशनचे अविनाश झाडे व अभिषेक झा यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. रिसोर्स पर्सन या पदाकरिता एकूण 44 जणांनी नोंदणी केली तर 8 जण प्रत्यक्ष परीक्षेकरिता उपस्थित होते. यातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना अजीम प्रेमजी फाउंडेशनच्या वतीने मध्य प्रदेश येथे रोजगार प्राप्त होणार आहे.

Orange City Plus Edition
20 November 2023 Page No. 2
epaper.navarashtra.com

# नागपुर विवि की महिला टीम को स्वर्ण पदक



भास्कर खेल | नागपुर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय की महिला टीम ने एचएसएनसी विश्वविद्यालय मुंबई द्वारा आयोजित एआईयू के पश्चिमी क्षेत्रीय अंतर-विश्वविद्यालय महिला टूर्नामेंट में स्वर्ण पदक जीता है। टूर्नामेंट में 50 विश्वविद्यालयों के लगभग 250 खिलाड़ियों ने भाग लिया। आखिरी राउंड में नागपुर के खिलाड़ियों ने सर्वोच्च ग्रेड हासिल कर खिताब जीता। दूसरा स्थान मुंबई यूनिवर्सिटी और तीसरा स्थान पुणे की भारती यूनिवर्सिटी को मिला। प्रतियोगिता में दमदार प्रदर्शन करने वाली नागपुर यूनिवर्सिटी की मृदुल डेहनकर को सर्वश्रेष्ठ खिलाड़ी का पुरस्कार दिया गया। प्रतियोगिता के विजेता को भारतीय विश्वविद्यालय संघ के निरीक्षक डॉ. आर के शर्मा के हाथों सम्मानित किया गया। कार्यक्रम की अध्यक्षता एचएसएनसी यूनिवर्सिटी के कुल सचिव डॉ. भगवान बालानी ने की। इस अवसर पर डॉ. तेजश्री शानबाग, प्रफुल्ल जावेरी, संदेश नागरनायक, जयश्री डांगचे आदि उपस्थित थे। विजेता टीम में सेंट विंसेंट पलोटी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग से मृदुल डेहनकर, तनया पांडे, सिया ठाकरे, मैथिली खुजे (सभी रामदेव बाबा इंजीनियरिंग कॉलेज), गायत्री पानबुडे (सिटी प्रीमियर कॉलेज), रिद्धि पालोरकर (हिस्लाप कॉलेज) शामिल थे। नागपुर महिला टीम को कोच जीत ठाकरे और टीम मैनेजर डॉ. प्रतिभा पवार का मार्गदर्शन प्राप्त हुआ। इस प्रदर्शन के दम पर नागपुर यूनिवर्सिटी महिला टीम ने ऑल इंडिया इंटर यूनिवर्सिटी टूर्नामेंट के लिए क्वालिफाई कर लिया है। नागपुर विश्वविद्यालय की महिला टीम को मिली सफलता के बारे में विश्वविद्यालय के खेल निदेशक डॉ. शरद सूर्यवंशी ने संतोष व्यक्त किया है और नागपुर विश्वविद्यालय के कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी, प्र कुलगुरु डॉ. संजय दुधे एवं कुलसचिव डॉ. राजू हिवसे ने उन्हें बधाई और भविष्य के लिए शुभकामनाएं दीं।



# ललित कला विभागात छायाचित्र प्रदर्शन

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ललित कला विभागात छायाचित्रण कार्यशाळा आणि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठाचा आयक्यूएसी विभाग व महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हे आयोजन करण्यात आले होते. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी व प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी छायाचित्र प्रदर्शनीची पाहणी केली. विद्यापीठाच्या आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य, ललित कला विभागप्रमुख डॉ. संयुक्ता थोरात, वृत्तछायाचित्रकार शेखर सोनी, कार्यशाळेचे प्रशिक्षक सुधारक ओळवे, डॉ. यश अलोणे, निर्माण चौधरी, भारतीय चित्रपट अभ्यासक अमृत गांगर, एमएसएफडीएचे व्यवस्थापक प्रतीक ढमाल, साहाय्यक गौरव पवार यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. विद्यापीठाच्या शैक्षणिक परिसराची विविध प्रकारे घेतलेली छायाचित्रे या प्रदर्शनात मांडण्यात आली होती. राज्याच्या विविध भागातून सहभाग घेतलेल्या प्रतिनिधींसाठी एक विषय देत लघुपट बनविण्याची स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत १५ चमूंनी सहभाग घेतला. डॉ. नीलिमा चरडे व प्रा. पोपट माने यांच्या 'अंतर्मन' या लघुपटाने प्रथम क्रमांक पटकाविला. मुंबई येथील जेनिफर बारला व मार्टिन मलुरी यांच्या चमूने तयार केलेल्या 'खत' या लघुपटाने द्वितीय तर छत्रपती संभाजीनगर येथील तुषार जाधव व कुशल बाबीस्वाल यांच्या चमूने तयार केलेल्या 'समवन यू लव' या लघुपटाने तृतीय क्रमांक प्राप्त केला. ललित कला विभागातील सफाई कामगार कल्पना वाघाडे, सपना खंडारे व भौतिकशास्त्र विभागातील कुलदीप हटवार यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. विजेत्यांना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ललित कला विभागातील कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

देशोन्नती

# नमो महारोजगार मेळाव्यासाठीऑनलाईन नोंदणीला सुरुवात

## बेरोजगारांना नोकरीची संधी

नागपूर ■ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय व कौशल्य रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ९ आणि १० डिसेंबरला जमनालाल बजाज भवन, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ परिसर, अमरावती रोड, नागपूर येथे भव्य असा नमो महारोजगार मेळावा आयोजित होणार आहे. मेळाव्यासाठी इच्छुक उमेदवारांनी दिलेल्या लिंकवर आपली नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता केंद्राच्या सहायक आयुक्तांनी केले आहे.

या महारोजगार मेळाव्यामध्ये १० हजारपेक्षा जास्त कुशल, अकुशल आणि अर्धकुशल तांत्रिक व अतांत्रिक क्षेत्रातील व प्रोफेशनल रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा मानस शासनाचा आहे. किमान दहावी व बारावी पास-नापास तसेच पदविका, पदवी व पदव्युत्तरधारकांनादेखील संधी उपलब्ध करून देण्यात येईल. उमेदवारांनी मुलाखतीच्या वेळेस आपल्या शैक्षणिक पात्रता व अनुभवाचे मूळ प्रमाणपत्र सोबत आणावे. बायोडाटाच्या छायांकित प्रती अधिक प्रमाणात सोबत ठेवाव्यात. उमेदवारांनी नोंदणीकरिता संकेतस्थळावर किंवा क्युआर कोडवर संपर्क साधावा.

तरुण, तरुणींचा बायोडेटाची छाननी करून काहींना मुलाखतीनंतर निवड झालेल्या उमेदवारांना ऑफर लेटर दिल्या जातील. तसेच प्राथमिक निवड केलेल्या शॉर्टलिस्ट उद्योजकांमार्फत केली जाईल.

नमो महारोजगार मेळावा हे एक अनोखे व्यासपीठ राहणार आहे की जिथे २ दिवसांत जवळपास ५० हजार तरुणांची उपस्थिती अपेक्षित आहे, मेळावा नोकरी इच्छुक उमेदवार, उद्योजक, नियुक्ते यांना नोकरी मिळवून देण्याकरिता अत्यंत आवश्यक माध्यम ठरेल, अशी अपेक्षा आहे.

जाहिर सुचना

नियोजित सह्याद्री क्रेडीट को-ऑपरेटीव्ह सोसायटी लि., वानाडोंगरी, ता. हिंगणा, जिल्हा नागपूर या संस्थेचा नोंदणी प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. तरी, 'नागपूर तालुक्यातील वानाडोंगरी कार्यक्षेत्राकरीता' अस्तीत्वात असलेल्या नागरी पत/ग्रामिण बिगर शेती सहकारी पत संस्थांना या जाहिर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, सदर संस्थेचे नोंदणी संबंधाने आपले काही आक्षेप असल्यास त्या संस्थांनी त्यांचे लेखी आक्षेप ७ दिवसांचे आत नोंदवावे. तसेच या अनुषंगाने आपणास काही म्हणने मांडावयाचे असल्यास, दिनांक ०२/१२/२०२३ रोजी पर्यंत सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या कालावधीत कार्यालयीन दिवशी या कार्यालयात खालील पत्त्यावर प्रत्यक्ष हजर राहून आपले म्हणने मांडावे.

विहीत मुदतीत लेखी आक्षेप प्राप्त न झाल्यास या संदर्भात आपली काहीही हरकत नसल्याचे गृहीत धरण्यात येईल व सदर संस्थेच्या नोंदणी संबंधाने पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

कार्यालयाचा पत्ता :-
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका हिंगणा
C/o. प्रदिप कुमार बंग यांचे राहते घरी, रायपुर हिंगणा
स्थळ : हिंगणा
दिनांक : २८/११/२०२३

सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था, तालुका हिंगणा

Deshonnati Edition
Nov 29, 2023 Page No. 3

TheHitavada
Nagpur City Line | 2023-11-30 | Page- 2
ehitavada.com

# PRESIDENT MURMU to deliver RTMNU's 111th convocation address on Dec 2

(Contd from page 1)

The university has completed 100 years of existence and this academic year is being celebrated as the centenary year. The work of imparting knowledge to the students is continuously going on through the affiliated colleges and post graduate education department of the university. The university is conducting a large number of examinations and everyone's participation is important, said Dr Subhash Chaudhary while interacting with mediapersons on Wednesday at RTMNU's Jamnalal Bajaj Bhavan.

The students who passed the examination conducted in winter 2022 and summer 2023 will be awarded the degrees. Two students will receive their respective medals at the hands of President. They include Dr R H Tupkari will be conferred with D.Sc from the Faculty of Science and Technology and Rajshree Ramteke will receive Dr T. V. Gedam Gold medal for fulfilling the criterion set by university to get Ph.D.

79,447 students will be awarded degrees in this convocation. Faculty-wise number of degrees to be confered upon eligible students from affiliated Colleges include Faculty of Science and Technology - 29,641, Faculty of Commerce and Management - 19,843, Faculty of Humanities - 19,312, Faculty of Interdisciplinary Studies - 3,951, Autonomous Colleges - 6,400, Degree Certificate - 300 medals/ awards.

In this convocation ceremony, 129 researchers are being honored with the title of Acharya. Acharya degree holders include 60 in the Faculty of Science and Technology, 21 in the Faculty of Commerce and Management, 36 in the Faculty of Humanities, 13 in the Faculty of Interdisciplinary Studies etc. The 100th convocation will be telecast live on the university YouTube channel from 9 am till the end of the program. This will make the facility of watching the live convocation ceremony of the university available to all the students and parents all over the world.

लोकमत

# रहाटे कॉलनी, मेडिकल चौकासह चार मार्ग 'नो पार्किंग झोन'

## राष्ट्रपतींच्या दौऱ्यानिमित्त कडेकोट सुरक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : उपराजधानीत काही दिवसांपासून वाहतूककोंडीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. त्यातच १ व २ डिसेंबर रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा नागपूर दौरा असल्यामुळे पोलिसांसमोर वाहतुकीचे नियोजन करण्याचे मोठे आव्हान आहे. रस्त्यांवर उभ्या असलेल्या वाहनांमुळे अनेकदा वाहतूककोंडी होते. त्यामुळे दोन दिवस रहाटे कॉलनी, मेडिकल चौक, तुकडोजी महाराज चौकासह चार मार्ग 'नो पार्किंग झोन' घोषित करण्यात आले आहेत.





या मार्गावर 'नो पार्किंग'

- रहाटे कॉलनी ते धंतोली पोलिस ठाणे
- धंतोली पोलिस ठाणे ते भोलागणेश चौक
- बैद्यनाथ चौक ते मेडिकल चौक ते रेल्वे मेन्स हायस्कूल टी-पॉइंट कांबळे चौक
- रेल्वे मेन्स हायस्कूल टी-पॉइंट कांबळे चौक ते जगन्नाथ मंदिर ते सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल तुकडोजी महाराज पुतळा

## बाहेरून येणारी वाहतूक वळविणार

लोकमत

# नागपूर विद्यापीठाचा १११ वा दीक्षांत समारंभ दोन टप्प्यांत

## राष्ट्रपतींच्या हस्ते तुपकरी यांचा डी.एस्सी. ने गौरव

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा १११ वा दीक्षांत समारंभ दोन टप्प्यात होणार आहे. पहिला समारंभ येत्या २ डिसेंबर रोजी होणार असून, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या अतिथी म्हणून उपस्थित राहणार त्यांच्या हस्ते एक डी.एस्सी. (डॉक्टर ऑफ सायन्स) आणि दोन (पीएच.डी.)धारकांना सुवर्णपदकाने (सन्मानि)त करण्यात येईल. दीक्षांत (समारंभा)चा दुसरा टप्पा फेब्रुवारीमध्ये (होणार अस)ून व त्यात सेनादलाचे प्रमुख (जनरल) मनोज पांडे यांना निमंत्रण (देण्यात आले अस)ल्याची माहिती विद्यापीठाचे कुलगुरू (डॉ. सुभा)ष चौधरी यांनी बुधवारी दिली.

दीक्षांत समारंभ २ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी १० वाजता रेशीमबागेतील कविवर्य सुरेश भट सभागृहात राष्ट्रपतींच्या उपस्थितीत होणार आहे. याप्रसंगी महाराष्ट्राचे राज्यपाल व विद्यापीठाचे कुलपती रमेश बैस तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित राहणार आहेत. याशिवाय या समारंभाला विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य तसेच सर्व विद्याशाखांचे सन्माननीय अधिष्ठाता उपस्थित राहतील.

या दीक्षान्त समारंभात विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतून डी.एस्सी. पदवी प्राप्त करणारे डॉ. रामचंद्र हरीसा तुपकरी आणि डॉ. टी. व्ही. गेडाम सुवर्णपदक आचार्य पदवी प्राप्त विद्यार्थिनी राजश्री ज्योतिदास रामटेके हिला राष्ट्रपतींच्या हस्ते गौरवान्वित करण्यात येईल.



रामचंद्र तुपकरी राजश्री रामटेके

नागपूर विद्यापीठाच्या १०० व्या दीक्षांत समारंभाला तत्कालीन राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम उपस्थित होते. विद्यापीठाच्या शतकीय वर्षाच्या दीक्षांत समारंभाला पुन्हा राष्ट्रपती उपस्थित राहणार आहेत, ही बाब उल्लेखनीय आहे. पत्रकार परिषदेला प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे, वित्त व लेखा अधिकारी हरीश पालीवाल उपस्थित होते. -वृत्त/२

Hello Nagpur
Page No. 1 Nov 30, 2023
Powered by: erelego.com

TheHitavada
Nagpur City Line | 2023-11-30 | Page- 1
ehitavada.com

# PRESIDENT MURMU to deliver RTMNU's 111th convocation address on Dec 2

Rambhau Tupkari to be conferred with DSc, Rajshri Ramteke to receive gold medal for her PhD at the hands of President Murmu

■ Staff Reporter

PRESIDENT of India Droupadi Murmu will address the 111th convocation ceremony of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University (RTMNU) on December 2, at 10 am. The ceremony will be held at Kavivarya Suresh Bhat Auditorium, Reshimbag.

Ramesh Bais, Governor and Chancellor of universities in Maharashtra, will preside over the convocation ceremony. Eknath Shinde, Chief Minister; Nitin Gadkari, Union Minister of Transport and Highways; Devendra Fadnavis, Deputy Chief Minister; Chandrakant Patil, Higher and Technical Education Minister, will be the guests.



President of India Droupadi Murmu

Dr Subhash Choudhari, Vice-Chancellor of RTMNU will deliver the welcome speech.

(Contd on page 2)

## Gen Manoj Pande to grace second phase

THE 111th convocation of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University will be held in two phases. First phase will be held on December 2, to be graced by President of India Droupadi Murmu. Since her schedule has time constraints, RTMNU authorities have approached General Manoj Pande, Chief of Army Staff with a request to be the chief guest for the second phase of the convocation. Dr Subhash Choudhari, V-C, RTMNU, told 'The Hitavada', "General Manoj Pande, an alumnus of RTMNU, has consented to grace the convocation. His office sought all details of the ceremony which we will provide soon. On the basis of the size of the convocation, he will intimate the date and time to us."

दशोन्नती

# रातुम नागपूर विद्यापीठ संघाला सुवर्ण

पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ बुद्धिबळ स्पर्धा

तरुण भारत
Apla Nagpur | 2023-11-30 | Page- 8
epaper.tarunbharat.net

# दीक्षान्त समारंभामध्ये ७९,४४७ विद्यार्थ्यांना प(दवी)

# प्रयास से ही जीवन में होगा बदलाव : डॉ. दुधे

- नागपुर विद्यापीठ का 'ग्राम चलो अभियान'
- गोटनगांव में कौशल विकास प्रशिक्षण का शुभारंभ

50 युवकों को मिलेगी ट्रेनिंग

... प्रशिक्षण कार्यक्रम शुरू किया गया। इस समय डॉ. दुधे मार्गदर्शन कर रहे थे। कार्यक्रम में 'ग्राम चलो अभियान' के नोडल अधिकारी डॉ. प्रशांत कडु, कुही के तहसीलदार शरद कांबले, टेक इट आइडियाज नागपुर के प्रबंध निदेशक प्रताप शुक्ला, गोसीखुर्द परियोजना प्रभावित कौशल विकास कार्यक्रम के स्थानीय समन्वयक अनुप रेडके, भरारी फाउंडेशन के निदेशक रमाकांत शेंडे, तुळशी के पूर्व उपसरपंच उत्तम देशपांडे, वेलगांव के पूर्व उपसरपंच परमानंद शेंडे, दहेगांव के पूर्व उपसरपंच जीतू गोडाने, नवेगांव तंटामुक्ति समिति के अध्यक्ष अजय घयाले, वेलतुर के सामाजिक कार्यकर्ता शरद सहारे मुख्य रूप से उपस्थित थे। अभियान अंतर्गत गोटनगांव में 50 युवाओं के लिए सूचना प्रौद्योगिकी कौशल विकास प्रशिक्षण की सुविधा उपलब्ध कराई गई है। यह प्रशिक्षण 15 दिवसीय होगा। प्रशिक्षण पूरा करने वाले युवाओं को विद्यापीठ द्वारा प्रमाणपत्र दिया जाएगा।

अभियान का उद्देश्य

... पर उपलब्ध प्राकृतिक संसाधनों का उपयोग करके ग्रामीण क्षेत्रों में रोजगार और स्वरोजगार के साधन उपलब्ध कराने का प्रयास किया जा रहा है। इस अभियान के तहत विद्यापीठ की ओर से परियोजना प्रभावित क्षेत्रों में पहले तीन बैठकें की जा चुकी हैं। इसके बाद यहां की जरूरत को देखते हुए शिक्षित युवाओं के लिए सूचना प्रौद्योगिकी कौशल विकास प्रशिक्षण कार्यक्रम शुरू करने का निर्णय लिया गया है।

Powered by iDocuments

# बीकेसीपी, सेंट क्लारेट ने बाजी मारी



भास्कर खेल | नागपुर. खेलो नागपुर टीम और राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर यूनिवर्सिटी के क्रीड़ा विभाग द्वारा संयुक्त रूप से आयोजित खेलो नागपुर ऑरेंज ओलिंपिक प्रतियोगिता के लड़कियों के ग्रुप में बीकेसीपी और लड़कों के ग्रुप में सेंट क्लारेट की टीम ने रिले में जीत हासिल की।

यूनिवर्सिटी के सिंथेटिक ट्रैक पर आयोजित इस प्रतियोगिता में बीकेसीपी की टीम ने अंडर-12 बालिका वर्ग की रिले स्पर्धा में 1 मिनट 7.54 सेकंड के समय के साथ शीर्ष स्थान प्राप्त किया। दूसरा स्थान पर भगवती गर्ल्स स्कूल की टीम 1 मिनट 7.84 सेकेंड के साथ रही। सेंट क्लारेट की टीम ने 1 मिनट 10.50 सेकंड का समय रिकॉर्ड किया और तीसरे स्थान पर रही। बालक वर्ग में सेंट क्लारेट की टीम ने 1 मिनट 4.23 के समय के साथ शीर्ष स्थान हासिल किया। बीकेसीपी 1 मिनट 5.39 सेकंड और एसएफएस 1 मिनट 7.19 सेकंड के समय के साथ क्रमशः दूसरे और तीसरे स्थान पर रहा। अंडर-16 बालिका वर्ग में सेंट क्लारेट ने 1 मिनट 2.1 सेकंड के समय के साथ पहला स्थान जीता। बीकेसीपी कन्हान 1 मिनट 4.1 सेकंड के साथ दूसरे और भगवती स्कूल 1 मिनट 4.35 सेकंड के साथ तीसरे स्थान पर रहा। टेबल-टेनिस में शर्वरी खोब्रागड़े ने तीन स्वर्ण पदक हासिल किया। सेंट क्लारेट और बीकेसीपी कन्हान क्रमशः 23 और 18 पदकों के साथ बढ़त को बनाए रखे हुए है। शर्वरी ने अंडर-15, 17 और अंडर-19 आयु वर्ग में स्वर्ण पदक हासिल किया।

# नागपुर विश्वविद्यालय का 111 वां दीक्षांत समारोह होगा दो चरणों में

## राष्ट्रपति की उपस्थिति में दो पदकों का वितरण, दूसरे समारोह का निमंत्रण सेना प्रमुख (को)

लोकमत समाचार सेवा

नागपुर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय का 111वां दीक्षांत समारोह दो चरणों में होगा. पहला समारोह आगामी 2 दिसंबर को होगा. दिसंबर 2023 को सुबह 10 बजे कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशमबाग में राष्ट्रपति की उपस्थिति में दीक्षांत समारोह होगा.

इस अवसर पर महाराष्ट्र के राज्यपाल एवं विश्वविद्यालय के कुलपति रमेश बैस, राज्य के मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय भूतल परिवहन एवं राजमार्ग मंत्री नितिन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तकनीकी शिक्षा मंत्री चंद्रकांत पाटिल उपस्थित रहेंगे. इनके अलावा इस समारोह में विश्वविद्यालय प्रबंधन परिषद सदस्य और सभी संकायों के सम्मानीय अधिष्ठाता भी मौजूद रहेंगे. इस दीक्षांत समारोह में विज्ञान व तकनीकी शिक्षा संकाय से डीएससी पदवी प्राप्त करने वाले डॉ. रामचंद्र हरीसा तुपकरी तथा डॉ. टी.वी. गेडाम व स्वर्ण पदक आचार्य पदवी प्राप्त छात्रा राजश्री ज्योतीदास रामटेके को राष्ट्रपति के हाथों प्रदान किए जाएंगे. नागपुर विश्वविद्यालय के 100वें दीक्षांत समारोह में तत्कालीन राष्ट्रपति डॉ. एपीजे अब्दुल कलाम उपस्थित हुए थे. पत्र परिषद में प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, डॉ. प्रफुल्ल साबले, हरीश पालीवाल उपस्थित थे.

द्रौपदी मुर्मु

### 79 हजार विद्यार्थियों को दी जाएगी डिग्री

रातुम नागपुर विश्वविद्यालय के दूसरे चरण का समारोह अगले साल फरवरी में होगा. इसमें तीनों सेना के प्रमुख जनरल मनोज पांडे के उपस्थित रहने का विश्वास कुलगुरु डॉ. चौधरी ने जताया. इस दौरान शीतकालीन 2022 व ग्रीष्मकालीन 2023 परीक्षा में उत्तीर्ण 79,447 विद्यार्थियों को डिग्री प्रदान की जाएगी. इनमें संकाय निहाय संख्या इस प्रकार है. विज्ञान व तकनीकी शिक्षा संकाय के 29,641, वाणिज्य व प्रबंधन संकाय के 19843, मानव विज्ञान संकाय के 19312, आंतरविद्याशाखीय अभ्यास संकाय के 3951, स्वायत्त महाविद्यालय के 6400, पदविका प्रमाणपत्र के 300 विद्यार्थियों का समावेश है.

Apna Nagpur
Page No. 4 Nov 30, 2023
Powered by: erelego.com

तरुण भारत
Apla Nagpur | 2023-11-29 | Page- 5
epaper.tarunbharat.net

# (वि)द्यापीठाच्या महिला संघाचे सुवर्ण यश

(पश्चिम वि)भागीय (आंतरविद्या)पीठ बुद्धिबळ स्पर्धा



स्पर्धेतील विजयी संघ व प्रशिक्षक जीत ठाकरे

... २८ नोव्हेंबर

(एचएस)एनसी विद्यापीठ आयोजित एआययूच्या (पश्चिम वि)भागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत दमदार खेळाच्या (राष्ट्र)संत तुकडोजी महाराज (नागपूर वि)द्यापीठाच्या महिला संघाने (सुवर्णपदक प)टकाविले.

५० विद्यापीठांचे २५० खेळाडू सहभागी (झाले होते. स्पर्धे)त शेवटच्या फेरीत (नागपूरच्या) खेळाडूंनी सर्वाधिक ग्रेड (मिळवत) विजेतेपद प्राप्त केले. (द्वितीय स्था)न मुंबई विद्यापीठाने तर (तृतीय स्था)न पुण्याच्या भारती (विद्यापीठाने) मिळविले. स्पर्धेत दमदार (कामगिरी) करणाऱ्या नागपूर (विद्यापीठाच्)या मृदुल डेहनकरला डॉ. आर. के. शर्मा यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान एचएनसी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. भगवान बलानी यांनी भूषविले.

विजयी संघात सेंट विन्सेट पॅलोटी अभियांत्रिकी महाविद्यालयाची ... गायत्री पाणबुडे (सिटी प्रीमिअर कॉलेज), रिद्धी पालोरकर (हिस्लॉप कॉलेज) यांचा समावेश होता. नागपूर महिला संघाने प्रशिक्षक जीत ठाकरे व संघ व्यवस्थापक डॉ. प्रतिभा पवार यांच्या मार्गदर्शनात हे यश प्राप्त केले. याच कामगिरीच्या जोरावर नागपूर (विद्यापीठाचा) महिला संघ अखिल (भारतीय) आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी (पात्र ठरल)ा आहे.

नागपूर विद्यापीठाच्या महिला संघाने मिळविलेल्या यशाबद्दल विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी समाधान व्यक्त केले असून नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्रकुलगुरू डॉ. संजय दुधे आणि कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी अभिनंदन करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. ◀(तभा वृत्तसेवा)

# महारोजगार मेले से उद्यमी बनने का अवसर : डॉ. सुभाष चौधरी

भास्कर संवाददाता | नागपुर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ के कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी ने कहा कि, नागपुर विद्यापीठ और महाराष्ट्र सरकार के कौशल, रोजगार, उद्यमिता और नवाचार विभाग ने मिलकर महारोजगार मेले का आयोजन किया, जिससे युवाओं को उद्यमी बनने का अवसर मिलेगा। साथ ही डॉ. चौधरी ने उद्योग सृजन की ओर रुझान रखने वाले विद्यार्थियों की भागीदारी बढ़ाने की अपील की।

### रोजगार एवं प्रशिक्षण अधिकारियों की बैठक

### 9-10 दिसंबर को होगा रोजगार मेला

कौशल, विकास, रोजगार और नवाचार विभाग के तहत, राज्य सरकार द्वारा राज्य स्तरीय नमो महारोजगार मेला का आयोजन 9 और 10 दिसंबर को किया गया है। नागपुर विद्यापीठ के जमनालाल बजाज प्रशासन भवन परिसर में यह रोजगार मेला आयोजित किया जाएगा।

... कार्यकर्ता शिवानी दानी उपस्थित थे। इंजीनियरिंग, वाणिज्य एवं प्रबंधन, फार्मास्युटिकल निर्माण एवं विज्ञान महाविद्यालयों में रोजगार एवं प्रशिक्षण अधिकारियों के साथ जुड़े उद्यमियों से जानकारी साझा की जाए। साथ ही इस महारोजगार मेले में उद्यमियों की भागीदारी बढ़ाई जाए। इस रोजगार मेले की जानकारी पूर्व विद्यार्थियों तक पहुंचाना, कॉलेज के उद्यमशीलता के इच्छुक छात्रों को इस पहल में भाग लेने के लिए प्रेरित करने जैसे विषयों पर इस बैठक में चर्चा की गई।

# विद्यापीठों के अनुसंधान को बढ़ावा देने के लिए 'टास्क फोर्स'

- अंतर्राष्ट्रीय विश्वविद्यालय और उद्योग की बढ़ेगी सहभागिता
- राज्य में राष्ट्रीय शिक्षा नीति का अमल

भास्कर संवाददाता | नागपुर.

राष्ट्रीय शिक्षा नीति के तहत राज्य में विद्यापीठ अनुसंधान पहलों को बढ़ावा देने और अनुसंधान गतिविधियों को सुव्यवस्थित करने के लिए 'महाराष्ट्र स्टेट क्रेडिबल रिसर्च एंड इनोवेशन टास्क फोर्स ग्रुप' (एमएसआरआरआईटी) का गठन किया गया है। उच्च व तकनीकी शिक्षा विभाग ने टास्क फोर्स के गठन को प्रशासनिक मंजूरी दी है। यह टास्क फोर्स राज्य के विद्यापीठों में गुणवत्तापूर्ण अनुसंधान के लिए निगरानी, मार्गदर्शन, प्रचार, क्षमता निर्माण और अनुसंधान गतिविधियों के लिए व्यापक नीतियां तैयार करने वाली शीर्ष संस्था रहेगी। साथ ही टॉस्क फोर्स द्वारा अंतर्राष्ट्रीय विश्वविद्यालय और उद्योग की सहभागिता और सहयोग को बढ़ाने के लिए एक सर्वसमावेशी प्रणाली विकसित की जाएगी, जिससे राज्य के विद्यापीठ अनुसंधान को काफी बढ़ावा ...

### यह है मुख्य उद्देश्य

राष्ट्रीय शिक्षा नीति में एक सर्वसमावेशी दृष्टिकोण से विद्यापीठ में अनुसंधान को बढ़ावा देना, उच्च शिक्षा संस्थानों को बहु-विषयक बनाना, स्नातक अध्ययन में अनुसंधान और इंटर्नशिप को शामिल करना, अनुसंधान-उन्मुख संकाय कैरियर प्रबंधन प्रणाली और अनुसंधान के लिए अनुकूल वातावरण को बढ़ावा देना, राज्य के विद्यापीठ और अन्य सार्वजनिक संस्थानों में अनुसंधान क्षमता को बढ़ाने, विशेष विषयों में अनुसंधान के लिए अतिरिक्त सहायता प्रदान करना, सफल अनुसंधान का सम्मान करना, सरकारी संस्थानों के साथ-साथ उद्योग के सहयोग से अनुसंधान करना शामिल है। इसलिए राज्य में राष्ट्रीय शिक्षा नीति-2020 का अमल करने के साथ अनुसंधान पहलों को बढ़ावा देने के लिए सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जलगांव और सीओईपी टेक्नॉलॉजी विद्यापीठ के सहयोग से 'महाराष्ट्र स्टेट क्रेडिबल रिसर्च एंड इनोवेशन टास्क फोर्स ग्रुप' (एमएसआरआरआईटी) का गठन किया ...

तरुण भारत
Apla Nagpur | 2023-11-30 | Page- 1
epaper.tarunbharat.net

# राष्ट्रपतींच्या दौऱ्यानिमित्त तीन हजार पोलिस सज्ज

- मार्गावर अतिरिक्त सीसीटीव्ही कॅमेरे
- आपत्कालीन मार्गही सुरक्षित
- पोलिस अधिकाऱ्यांनी केले मार्गाचे निरीक्षण

◆ नागपूर, २९ नोव्हेंबर

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या दोन दिवसीय नागपूर दौऱ्यानिमित्त तीन हजार पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त राहणार आहे. पोलिस अधिकाऱ्यांनी मार्गाचे निरीक्षण तसेच कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेतला. याशिवाय मार्गावर अतिरिक्त सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची व्यवस्था केली जात आहे. सुरक्षेच्या दृष्टीकोनातून वाहतूक मार्गात बदल करण्यात आले आहेत. आपातकालिन मार्गही सुरक्षित ठेवण्यात आला आहे. पोलिस उद्या ...

### बाहेरून येणारी वाहतूक वळविणार

शहरात वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी वर्धा मार्गाकडून येणारी जड वाहतूक जामठा टी पॉईंट येथे थांबविण्यात येईल किंवा आवश्यकतेनुसार वळविण्यात येईल. त्याचप्रमाणे दिघोरी नाका ते मेडिकल व मानेवाडा चौकाकडे वाहतूक आऊटर रिंग रोडने वळविण्यात येईल. कळमेश्वर व वाडीमार्गे येणारी जड वाहतूक नवीन काटोल टोल नाक्यावरून आवश्यकतेनुसार इतर मार्गाने वळविण्यात येईल. ■

कॉलनी चौकासह काही विशिष्ट मार्गावरून वाहतूक वळवण्यात आली आहे. रहाटे कॉलनी, मेडिकल चौक, तुकडोजी पुतळा चौकासह चार मार्ग दोन दिवस 'नो पार्किंग झोन' घोषित ...

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# (नागपूर) विद्यापीठाचा १११ वा दीक्षांत सोहळा शनिवारी

## राष्ट्रपतींची उपस्थिती; डॉ. तुपकरींचा सन्मान

लोकसत्ता खास प्रतिनिधी

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा १११ वा दीक्षांत समारंभ २ डिसेंबरला सकाळी १० वाजता कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित करण्यात येणार आहे. या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उपस्थित राहणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी पत्रकार परिषदेत दिली. दीक्षांत समारंभात विज्ञान व तंत्रज्ञान शाखेतून डी.एस्सी. या पदवीने डॉ. रामचंद्र हरिसा तुपकरी यांना तर डॉ. टी.व्ही. गेडाम आचार्य पदवी सुवर्ण पदकाने राजश्री ज्योतीदास रामटेके यांना राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.



नागपूर विद्यापीठाचा १००वा दीक्षांत सोहळा माजी राष्ट्रपती भारतरत्न ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा झाला होता. त्यानंतर विद्यापीठाच्या शतकोत्तर वर्षात होणाऱ्या १११ व्या दीक्षांत सोहळ्याला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उपस्थित असल्याने विद्यापीठासाठी ही गौरवाची बाब राहणार आहे. १११व्या दीक्षांत ...

### ७९ हजार पदव्यांचा समावेश

विद्यापीठाच्या १११ व्या दीक्षान्त समारंभात ७९ हजार ४४७ पदवी आणि पदव्युत्तर पदवींचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये हिवाळी २०२२ मधील ९ हजार १३८ तर उन्हाळी २०२३ मधील ७० हजार ३०९ पदवींचा समावेश करण्यात आला आहे. याशिवाय ... आचार्य पदवी प्रदान करण्यात येतील.

30/11/2023 | Nagpur | Page : 11
Source : https://epaper.loksatta.com

लोकमत

# नागपूर विद्यापीठाचा १११ वा दीक्षांत समारंभ दोन टप्प्यांत

(पान १ वरून)

### ७९ हजार विद्यार्थ्यांना पदवीदान

विद्यापीठाच्या दुसऱ्या टप्प्यातील समारंभ पुढच्या वर्षी फेब्रुवारी २०२४ मध्ये होणार आहे. यात सेनादलाचे प्रमुख जनरल मनोज पांडे उपस्थित राहतील, असा विश्वास कुलगुरू डॉ. चौधरी यांनी दिला. यावेळी हिवाळी २०२२ व उन्हाळी २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या ७९,४४७ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान केली जाणार आहे.

यामध्ये विद्याशाखानिहाय संख्या : विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे २९,६४१, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे १९८४३, मानवविज्ञान विद्याशाखेचे १९३१२, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे ३९५१, स्वायत्त महाविद्यालये ६४००, पदविका प्रमाणपत्र ३०० अशा विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

### १२९ आचार्य पदवीधारक

विद्यापीठांतर्गत शिक्षक व संशोधक विद्यार्थी संशोधनाचे कार्य करतात. या दीक्षान्त समारंभात विद्याशाखानिहाय १२९ संशोधकांना आचार्य पदवी देऊन सन्मानित करण्यात येईल. यात विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेत ६०, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेत २१, मानवविज्ञान विद्याशाखेत ३६, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेत १३, आदींचा समावेश आहे.

Hello Nagpur
Page No. 2 Nov 30, 2023
Powered by: erelego.com

# ८० हजार पदव्या, १२९ पीएचडी

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

डॉ. रामचंद्र तुपकरी राजश्री रामटेके

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा १११वा दीक्षांत समारंभ शनिवार, २ डिसेंबर २०२३ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत होणार आहे. या कार्यक्रमात १२९ पीएचडी आणि सुमारे ८० हजार पदव्या प्रदान केल्या जाणार आहेत. रेशीमबागेतील कविवर्य सुरेश भट सभागृहात सकाळी १० वाजता हा समारंभ होईल.

नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी पत्रपरिषदेत ही माहिती दिली. पत्रपरिषदेला प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, परीक्षा आणि मूल्यमापन विभागाचे संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे उपस्थित होते.

■ राष्ट्रपतींच्या उपस्थितीत शनिवारी दीक्षांत समारंभ

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलपती रमेश बैस राहतील. दीक्षांत समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय परिवहन व महामार्गमंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उच्चशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित राहतील. या दीक्षांत समारंभात विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतून डीएस.सी. पदवी प्राप्त करणारे डॉ. रामचंद्र तुपकरी आणि डॉ. टी. व्ही. गेडाम सुवर्णपदक आचार्य पदवीप्राप्त विद्यार्थिनी राजश्री ज्योतीदास रामटेके यांना राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मानित केले जाणार आहे. याशिवाय, १२९ संशोधकांना आचार्य पदवी देऊन सन्मानित करण्यात येईल. आचार्य पदवीधारकांमध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील ६०, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतील २१, मानवविज्ञान विद्याशाखेतील ३६ आणि आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेतील १३ जणांचा समावेश आहे.

### विद्याशाखानिहाय पदवीधारक

- विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा : २९,६४१
- वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा : १९,८४३
- मानव विज्ञान विद्याशाखा : १९,३१२
- आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा : ३,९५१
- स्वायत्त महाविद्यालये : ६,४००
- पदविका प्रमाणपत्रे : ३००

# (प)एचडीपूर्व कोर्सवर्क

## (डिसेंब)र, जानेवारीमध्ये नागपूर विद्यापीठाचे आयोजन, वेळापत्रक जाहीर

कॅम्पस कनेक्ट

... यासाठीची मार्गदर्शक तत्त्वे ५ मे रोजी विद्यापीठाने प्रसिद्ध केली होती. त्यानुसार, येत्या दोन महिन्यांत दोन टप्प्यांत हे कोर्सवर्क आयोजित करण्यात आले आहे. नागपूर विद्यापीठाच्या यूजीसी-एचआरडीसी विभागाच्यावतीने हे आयोजन केले जाईल.

या कोर्सवर्कचा पहिला टप्पा ११ डिसेंबर ते २३ डिसेंबरदरम्यान होईल. त्यानंतरचा टप्पा ८ ते २० जानेवारीदरम्यान घेण्यात येईल. या दोन्ही टप्प्यांतील कोर्सवर्ककरिता प्रत्येकी शंभर विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार असल्याचे विद्यापीठाने कळविले आहे. या दोन्ही टप्प्यांतील कोर्सवर्कच्या समन्वयकांची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

कोर्सवर्कमध्ये सहभागी होण्याकरिता विद्यार्थ्यांना अर्ज करावा लागणार आहे. हा अर्ज संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. याशिवाय, कोर्सवर्कला प्रवेश घेण्याकरिता विद्यापीठाने सात हजार रुपये शुल्क निर्धारित केले आहे. विद्यापीठातील लेखा विभागात हे शुल्क भरावयाचे आहे. त्यानंतर शुल्क भरल्याची पावती, पीएचडी नोंदणी पत्र आणि इतर आवश्यक कागदपत्रे यूजीसी-एचआरडीसी विभागाकडे सादर करावयाची आहेत, असे नागपूर विद्यापीठाने कळविले आहे.



ई मासिक विद्यासंवाद
नोव्हेंबर २०२३|आवृत्ती-०५

## विद्यापीठ गीत

या भारतात बंधुभाव नित्य वसू दे ।
दे वरचि असा दे ।
हे सर्व पंथ-संप्रदाय एक दिसू दे ।
मतभेद नसू दे ।। धृ.।।

नांदोत सुखे गरीब-अमीर एकमतांनी ।
मग हिंदु असो ख्रिश्चन, वा हो इस्लामी ।
'स्वातंत्र्यसुखा' या सकलांमाजि वसू दे ।
दे वरचि असा दे ।। १ ।।

सकळांस कळो 'मानवता, राष्ट्रभावना' ।
हो सर्वस्थळी मिळुनि 'समुदाय-प्रार्थना' ।
उद्योगि तरुण वीर, शीलवान दिसू दे ।
दे वरचि असा दे ।। २ ।।

हा जातिभाव विसरुनिया एक हो आम्ही ।
अस्पृश्यता समूळ-नष्ट हो जगातुनी ।
खळ-निंदका-मनीहि 'सत्य-न्याय' वसू दे ।
दे वरचि असा दे ।। ३ ।।

सौंदर्य रमो घरघरांत स्वर्गियापरी ।
ही नष्ट होऊ दे विपत्ती, भीति बोहरी ।
तुकड्यास सदासर्वदा सेवेस कसू दे ।
दे वरचि असा दे ।। ४ ।।

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**




**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर**

जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, कॅम्पस चौक ते अंबाझरी टी-पॉईंट मार्ग, नागपूर-४४० ०३३.
दूरध्वनी : ९१-७१२-२९५६३०४ ईमेल : registrar@nagpuruniversity.nic.in वेबसाईट : www.nagpuruniversity.ac.in